cmyk

## संपादकीय

### राज्याच्या राजकारणात विखारी वाढतेय!

देशातील सर्वात प्रगल्भ आणि पुरोगामी राज्य म्हणून ज्याचा लौकिक आहे त्या महाराष्ट्राने यापूर्वी अनेक वक्ते देशाला दिले आहेत. पण महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पटलावर जी काही डायलॉगबाजी सुरू आहे ती पाहता व्यासपीठ गाजवण्याच्या हेतूपेक्षाही ज्याच्यावर टीका करत आहात त्याला दुखावण्याचा हेतूच जास्त दिसत आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये मुळातच महाराष्ट्राच्या राजकारणाने वेगळे वळण घेतले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या दोन महत्त्वाच्या पक्षांमध्ये फूट पडली.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


## नवी दिल्लीत भाजपच्या वतीने तिरंगा यात्रा

नवी दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनावर देशभरात हर घर तिरंगा अभियान सुरू करण्यात आले असून, या अंतर्गत तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. रविवारी (दि. ११ ऑगस्ट) राजधानी दिल्लीतील नवी दिल्ली मतदारसंघात तिरंगा यात्रा काढण्यात आली. यामध्ये भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ, खासदार बांसुरी स्वराज सहभागी झाले होते. सोबतच मोठ्या प्रमाणात पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते. देशात ११ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा मोहीम राबविली जात आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–११२ | सोमवार दि.१२ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांचे उत्पन्न नाही; आत्महत्या दुप्पट झाल्या!

## पंतप्रधान मोदी यांच्या वक्तव्याचा समाचार घेत शरद पवार यांचा सरकारवर हल्लाबोल

**बार्शी । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे सांगितले होते. पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या दुप्पट झाल्या असल्याचे मत व्यक्त करीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार पक्ष) प्रमुख शरद पवार यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.**

सोलापर जिल्ह्यातील बार्शी येथे आयोजित केलेल्या शेतकरी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माढा लोकसभेचे नूतन खासदार धैर्यशील भैय्या मोहिते पाटील, कर्जत–जामखेडचे आमदार रोहीत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शरद पवार म्हणाले, शेतकऱ्याला त्याच्या घामाची किंमत देण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारची असल्याचे ते म्हणाले. सत्तेचा उपयोग शेतकऱ्यांसाठी, तरुणांना रोजगार देण्यासाठी केला जात नसल्याचे शरद पवार म्हणाले. नवीन कारखाने झाले पाहिजेत, रोजगार वाढले पाहिजेत असे शरद पवार म्हणाले. त्यामुळे सरकर बदलण्याची गरज असल्याचे पवार म्हणाले. शेतकऱ्यांच्या डोक्यावरचे ओझे कमी केलं पाहिजे. आम्ही ८० हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याचा उल्लेख



शरद पवार यांनी केला. तसेच आमचे सरकार असताना शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करुन आम्ही शेतमालाला दर दिल्याचे शरद पवार म्हणाले. अधिक उत्पन्न झाल्यानंतर शेतकऱ्यांचा शेतमाल जगाच्या बाजारपेठेत कसा जाईल याचा आम्ही विचार केल्याचे शरद पवार म्हणाले. फळबागसारखी योजना आमच्या सरकारने आणली होती. ◀◀ पान २ वर

## हिंडेनबर्गच्या अहवालानंतर विरोधक आक्रमक





**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**हिंडेनबर्गच्या नव्या अहवालानंतर राजकीय पक्षांकडून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले जात असून, काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. अदानींच्या सेबीच्या तपासातील सर्व हितसंबंध दूर करण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. पक्षाने असा युक्तिवाद केला की देशाच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांच्या कथित संगनमताची निष्पक्ष चौकशी केवळ जीपीसी (संयुक्त संसदीय समिती) स्थापन करून केली जाऊ शकते, असे जयराम रमेश म्हणाले.**

हिंडेनबर्गने आपल्या नवीन अहवालात म्हटले आहे की, त्यांनी १८ महिन्यांपूर्वी अदानी समूहाबाबत ◀◀ पान २ वर

# २८८ सोड, ८८ लढवून ८ आमदार निवडूण आणून दाखव

## छगन भुजबळांचा मनोज जरांगेंवर थेट हल्लाबोल; ओबीसींवर चालून येणाऱ्यांना सोडू नका–भुजबळ

**सांगली । प्रतिनिधी**

**मनोज जरांगे यांनी सगेसोयऱ्यांची मागणी मान्य होणे शक्य नाही, सगळ्यांनाच कुणबी व्हायचे आहे मग राज्यात मराठा शिल्लक राहील का असा सवाल राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना विचारला. सगळेच मराठे वाईट नाहीत, पण ओबीसींच्या अंगावर येणाऱ्यांना सोडू नका असे आवाहन छगन भुजबळांनी केले आहे. २८८ सोड, असे ८८ जागा लढवून दाखव आणि त्यातले अवघे ८ आमदार निवडूण आणून दाखवं असे थेट आव्हान मनोज जरांगे यांना त्यांनी सांगलीतील ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यात केले.**




यावेळी बोलतानान भुजबळ म्हणाले, राज्यात २८८ जागांवर उमेदवार उभे करू असे ते म्हणतात, अरे ८८ जागा लढवून दाखव आणि त्यातले ८ निवडून आणून दाखव, असे आव्हान भुजबळांनी मनोज जरांगे यांना दिले. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नाही, सगेसोयऱ्यांना देखील आरक्षण देता येणार नाही हे जरांगेंनी समजून घ्यावे असे देखील ते म्हणाले.

सांगलीचे वसंतदादा कुठे आणि आता त्याचे वारसदार कुठे असे म्हणत भुजबळांनी खासदार विशाल पाटील यांच्यावर टीका केली. तसेच मनोज जरांगे म्हणजे नवीन नेता असा उल्लेखही त्यांनी केला. आरक्षण हे आर्थिक स्थितीवर नसून सामाजिक मागासलेपणावर आहे, हे त्याला कसे समजणार असे म्हणत भुजबळांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली.

### मराठा शिल्लक राहील का?

छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेतात आणि आपल्याच लोकांवर हल्ले करतात. आज गावागावात ओबीसींवर हल्ले होत आहेत. आरक्षण कायद्यानुसार द्या, ही आमची भूमिका आहे. आमच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्या. सर्वांनाच कुणबी व्हायचं आहे तर मग मराठा शिल्लक राहील का?, असा सवाल यावेळी भुजबळ यांनी उपस्थित केला आहे.

# गेवराईत वेगळ्या राजकीय समिकरणाची नांदी

## मस्के दाम्पत्याची बीआरएसला सोडचिठ्ठी; मयुरीताई मस्के–खेडकर यांच्या भुमिकेकडे लक्ष




**गेवराई । प्रतिनिधी**

बीआरएस पक्ष गेवराई विधानसभा समन्वयक मयुरीताई मस्के–खेडकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा महाराष्ट्र राज्यातील पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांच्याकडे सुपूर्द केला आहे. लोकसभा निवडणुकीत तसेच आगामी विधानसभा निवडणुकीत पक्ष कोणतीच भुमिका जाहिर करत नसल्याने कार्यकर्ते संभ्रमात असल्याचे कारण देत हा राजीनामा दिला आहे. दरम्यान मयुरीताई मस्के खेडकर यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिल्याने जिल्हा सह तालुक्यात पक्षाला मोठे खिंडार पडणार आहे. तर विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ते आता कोणती भुमिका घेतात याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून आहे.


तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समिती पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा ट्विस्ट आणला होता. बीड जिल्ह्यात देखील जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाळासाहेब मस्के व मयुरीताई मस्के –खेडकर या दाम्पत्यांनी या पक्षात प्रवेश करुन गेवराईच्या राजकारणात खळबळ उडवून दिली होती. यानंतर त्यांनी गेवराई तालुक्यातील रेवकी–देवकी या प्रतिष्ठेच्या ग्रामपंचायत निवडणुकीत ◀◀ पान २ वर

### कार्यकर्ते संभ्रमात, म्हणून दिला राजीनामा– मयुरीताई मस्के

आपण तळागाळापर्यंत पक्ष वाढवला, आंदोलन केली, पक्षासाठी पुर्ण वेळ दिला. मात्र पक्षाने गेल्या वर्षभरापासून कसलीच भुमिका न घेतल्याने सामान्यांसाठी काम करणे अवघड होत होते. तसेच लोकसभा निवडणुकीत कोणतीच भुमिका घेतली नाही, आता विधानसभा निवडणुक जवळ आली तरी कसलीही भुमिका पक्षाने घेतली नाही. आमचे कार्यकर्ते त्यामुळे संभ्रमात आहेत. त्यामुळे बीआरएस पक्षाला सोडचिठ्ठी दिली असल्याचे मयुरी बाबासाहेब मस्के–खेडकर यांनी सांगितले.

# बीडचे भगवे वादळ आज मुंबईत धडकणार; ४०० गाड्या जाणार





**बीड। प्रतिनिधी**

उबाठा शिवसेनेला पुन्हा खिंडार पडले असून बीडचे भगवे वादळ दि. १२ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीतउबाठा गटाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अॅड संगीता चव्हाण व सर्व महिला पदाधिकारी, युवासेना जिल्हाप्रमुख अॅड रवीराज बडे, गजानन कदम यांच्यासह शेकडो शिवसैनिक शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. यावेळी बीडहून ४०० गाड्यांचा ताफा मुंबईला जाणार असल्याची माहिती शिवसेना ◀◀ पान २ वर

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत संगिता चव्हाण, रविराज बडे, गजानन कदम यांचा पक्ष प्रवेश–जगताप, मुळूक

### हजारो महिला प्रवेश करणार– अॅड. संगीता चव्हाण

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्यात सामान्य गोरगरीब महिलांसाठी कायम आदरभाव दिसून येतो आहे. यामुळे बीड जिल्ह्यातून आम्ही हजारो महिला आज मुंबई येथे प्रवेश करत आहोत, असे मत अॅड. संगीता चव्हाण यांनी व्यक्त केले.

### मुख्यमंत्र्यांची कार्यपद्धती तरुणांना आकर्षित करणारी–कदम, बडे

मुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते यांच्या वतीने सामान्य माणसांसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या नावीन्यपूर्ण योजना, शिंदे साहेबांची निर्णयक्षमता तसेच त्यांची कार्यपद्धती आणि पक्ष बांधणीची कसब आम्हा तरुणांना आकर्षित करणारी ठरली आहे, असे मत गजानन कदम आणि अॅड रविराज बडे यांनी व्यक्त केले.

## कर्मचारी जाणार संपावर

मुंबई : महाराष्ट्रातील तब्बल १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहेत. मुंबईत पार पडलेल्या राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीच्या बैठकीमध्ये हा निर्णय ◀◀ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२.०० क्विंटल | २,५०१ | २,७७१ | २,६३६ |
| ज्वारी/हायब्रिड :५३.०० क्विंटल | २,०२१ | २,६०० | ३०० |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ८.०० क्विंटल | ६,९०० | ९,२०१ | ८,०५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २०.५० क्विंटल | २,२०० | २,८०१ | २,५६१ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ८५.५० क्विंटल | ४,१५० | ४,२४० | ४,२१६ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ५,५०१ | ६,८५० | ६,३८० |

# आजीकडून खोट्या मंजूऱ्यांचे दावे, माजीकडून सहा महिन्यापूर्वी मयताच्या कुटुंबाला भेटी

## माजी मंत्री सुरेश धस यांच्याकडून नाव न घेता आजबे –धोंडे यांच्यावर टीका

**आष्टी । प्रतिनिधी**

विधानसभा सदस्य नसताना देखील मी विधान परिषदेत विधानसभेप्रमाणे काम केले आहे.मी लोकसभेलाच माझ्या कार्यकर्त्याला आणि मला मानणाऱ्या लोकांना सांगितले होते की मला कवडयात कवडया मिसळायच्या नाहीत.सध्या आजी–माजींचे जोरात गाव भेट दौरे चालू आहेत. मात्र या दौऱ्यात गेल्या सहा महिन्यापूर्वी मध्ये मयत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबांना भेटायसाठी माजी आमदार जात आहेत आजी आमदार तर खोटे



दावे करत आणि खोट्या मंजुऱ्याचे दावे करत गावागावात दौरे करताना पाहायला मिळत आहे आणि सोशल मीडियावर देखील खोट्या मंजुरीच्या पोस्ट व्हायरल करत आहेत. गावोगावी विकास कामांचे नारळ फोडायचे काम चालू आहे आणि माणसाचा तर पत्त्या नाही असे चित्र पाहायला मिळत असल्याचाही टोला माजी मंत्री सुरेश धस यांनी आजबे,धोंडे यांचे नाव न घेता त्यांना लगावला. ते आष्टी तालुक्यातील लोणी, ◀◀ पान २ वर

## विनेशचा निकाल १३ ऑगस्टला

नवी दिल्ली : भारतीय कुस्तीपटू फायनलमध्ये जाऊनही तिला सामन्याच्या दिवशी अवघे १०० ग्रॅम वजन जास्त भरले म्हणून अपात्र ठरविण्यात आले. अवघा भारत तिच्या गोल्ड मेडलची वाट पाहत असताना सकाळीच करोडो लोकांचा अपेक्षाभंग झाला. ऑलिम्पिकच्या या निर्णयाविरोधात जनमत संतप्त झाले. संसदेतही प्रतिक्रिया उमटली. या निर्णयाविरोधात अपिलही करण्यात आले. सुनावणीवर शनिवारी निकाल येणे अपेक्षित होते. परंतू तो आता १३ ऑगस्टला देण्यात येणार आहे. ◀◀ पान २ वर

# नेत्याच्या उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांची अशीही शक्कल

**बीड । प्रतिनिधी**

**यंदा माजलगाव मतदार संघातून निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी माजलगाव मतदारसंघातील शेकडो कार्यकर्त्यांनी केली आहे. आपल्या नेत्याला उमेदवारी मिळावी, यासाठी कार्यकर्त्यांनी आता नवी शक्कल लढवली आहे. त्याची सध्या जोरदार चर्चा आहे. कार्यकर्त्यांनी स्टॅम्प पेपरवर शपथ पत्र लिहून ते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे दिले आहे. आता पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेते याकडे लक्ष लागले आहे.**



### नारायण डकांसाठी शरद पवार, जयंत पाटील यांच्याकडे दिले बॉण्डवर शपथपत्र

माजलगाव मतदारसंघ यंदा महाराष्ट्रामध्ये चांगलाच चर्चेत आला आहे. या ठिकाणी असलेले विद्यमान आमदार अजित पवार गटाचे प्रकाश सोळुंके यांनी निवडणुकीतून माघार घेतली असल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी पक्षामध्ये



राज्यात फूट पडल्यानंतर आमदार प्रकाश सोळंके ◀◀ पान २ वर

# जम्मू–काश्मीरात अडीच महिन्यांत ११ हल्ले!

## रविवारच्या हल्ल्यात दोन जवान शहीद, संरक्षण तज्ज्ञांकडून चिंता व्यक्त

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**जम्मू–काश्मीरमध्ये गेल्या ७८ दिवसांत ११ दहशतवादी हल्ले झाले असून गत अडीच महिन्यांत दहशतवादी हल्ल्याची झालेली वाढ चिंताजनक असल्याचे मत संरक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. जम्मू–काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील कोकरनागमध्ये दहशतवाद्यांशी रविवारी झालेल्या चकमकीत लष्कराचे दोन जवान शहीद झाले आहेत, तर एक जण जखमी आहे. जखमी जवानाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या चकमकीत एका नागरिकाचाही मृत्यू झाला असून, एक जखमी झाला आहे. त्याच्यावरही रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

लान्स नाईक प्रवीण शर्मा आणि हवालदार दीपक कुमार यादव, अशी शहीद झालेल्या जवानांची नावे आहेत. शनिवारपासून अनंतनागमध्ये ही चकमक सुरू आहे. गडोळेच्या जंगलात आणखी दोन दहशतवादी लपल्याची ◀◀ पान २ वर

### पाकच्या नापाक कारवायांचा पर्दाफाश

काश्मीर खोऱ्यातील पाकिस्तानी लष्कर आणि गुप्तचर संस्था आयएसआयच्या कारस्थानाबाबत मोठा खुलासा झाला आहे. दहशतवादी सीमेपलीकडून सातत्याने घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. पीओकेच्या अनेक भागात दहशतवादी सक्रिय आहेत. आयएसआय या दहशतवाद्यांना घुसखोरीसाठी मदत करत आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील २० भागात दहशतवादी सक्रिय आहेत. एलओसीवरील दहशतवादी हालचालींनंतर भारतीय लष्कर चोवीस तास अलर्ट मोडमध्ये आहे.

cmyk

## अग्रलेख

# राज्याच्या राजकारणात विखारी वाढतेय !

देशातील सर्वात प्रगल्भ आणि पुरोगामी राज्य म्हणून ज्याचा लौकिक आहे त्या महाराष्ट्राने यापूर्वी अनेक वक्ते देशाला दिले आहेत. पण महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पटलावर जी काही डायलॉगबाजी सुरू आहे ती पाहता व्यासपीठ गाजवण्याच्या हेतूपेक्षाही ज्याच्यावर टीका करत आहात त्याला दुखावण्याचा हेतूच जास्त दिसत आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये मुळातच महाराष्ट्राच्या राजकारणाने वेगळे वळण घेतले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या दोन महत्त्वाच्या पक्षांमध्ये फूट पडली. त्यानंतर विखारी संवादाच्या माध्यमातून त्या त्या पक्षांची मते बाहेर येत आहेत.

गेल्या काही दिवसांमध्ये सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी फेकलेले डायलॉग पाहता सर्वांनाच 'तोल मोल के बोल' हा सल्ला देण्याची गरज वाटू लागली आहे. खरेतर सामाजिक जीवनात वावरणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नेहमीच तोलून मापून बोलणे आणि वागणे अपेक्षित असते. कारण त्यांच्या बोलण्याच्या आणि वागण्याचा कोणता अर्थ घेतला जाईल याची कोणतीच खात्री देता येत नाही. विशेषतः आधुनिक कालावधीमध्ये सोशल मीडिया प्रचंड प्रमाणात सक्रिय असताना राजकीय पक्षांच्या नेत्यांना सावधगिरीनेच आपला संवाद साधावा लागतो. पण जेव्हा या संवादाचे रूपांतर डायलॉगमध्ये होते तेव्हा मात्र सर्व मर्यादा उलटून जातात आणि केवळ प्रतिपक्षाच्या नेत्यांना मानसिकरित्या जखमी करणे हा एकच हेतू बाकी राहतो.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी गेल्या आठवड्यामध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून केलेली एकेरी टीका असो किंवा एखादा इशारा असो किंवा त्यानंतर पुणे येथे झालेल्या जाहीर सभेमध्ये केलेली जहरी टीका असो यामधून फक्त समोरच्या नेत्यांना दुखावण्याचाच हेतू समोर येत आहे. अर्थात, काही दिवसांपूर्वी पुण्याच्याच व्यासपीठावरून बोलताना भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख औरंगजेब फॅन क्लबचे सदस्य असा केला होता हेसुद्धा या ठिकाणी विसरून चालणार नाही. त्यापूर्वीही गेल्या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे यांनी अमित शहा यांचा उल्लेख महाराष्ट्रावर चालून आलेला अफजलखान असा केला होता. जेव्हा एखादा नेता बोलण्याच्या भरात असा एखादा उल्लेख करतो तेव्हा साहजिकच ज्या नेत्यावर ही टीका केलेली असते त्या नेत्याचे अनुयायी त्याला उत्तर देताना त्याच प्रकारची पातळी गाठतात हे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

उद्धव ठाकरे यांचे डोके बिघडले आहे, ही देवेंद्र फडणवीस यांनी पातळी सोडून दिलेली प्रतिक्रिया त्याचे उदाहरण मानावे लागेल. भाजप आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांच्यातील राजकीय वैर गेल्या काही दिवसांपासून वाढत चालले असताना महाराष्ट्रात इतरही काही घटना घडत आहेत, ज्यामधून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे नकारात्मक दर्शन होताना दिसत आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मटकरी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते यांच्यामध्ये झालेल्या शाब्दिक चकमकीनंतर ज्या प्रकारची खालच्या थरातील डायलॉगबाजी झाली ती सुद्धा महाराष्ट्राच्या संस्कृतीला अपेक्षित नाही. राजकारणामध्ये विविध प्रकारची राजकीय विचारधारा जोपासणाऱ्या राजकीय पक्षांमध्ये मतभेद असणे समजण्यासारखे असले, तरी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गेल्या काही कालावधीपासून मनभेद होण्याचे आणि ते वाढण्याचे जे प्रकार होत आहेत ते मात्र चिंताजनक आहेत. खरे तर चुकीच्या डायलॉगबाजीमुळे काय होऊ शकते याची अनेक उदाहरणे महाराष्ट्राच्या राजकारणाने यापूर्वीच दाखवून दिली आहेत. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर तत्कालीन गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील यांनी केवळ हिंदी भाषेच्या अज्ञानामुळे जे काही विधान केले होते त्याचा फटका त्यांना बसला होता आणि त्यांना उपमुख्यमंत्री पद सोडावे लागले होते. भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांनीसुद्धा बोलण्याच्या भरात त्यांच्या बोली भाषेमध्ये बळीराजासंदर्भात एक विशेषण लावल्यामुळे वाद निर्माण झाला होता. साहजिकच तोलून मापून संवाद फेक केली नाही तर त्याचे दूरगामी नकारात्मक परिणाम होऊ शकतात याची अनेक उदाहरणे समोर असूनही विद्यमान राजकीय नेत्यांना त्याची जाणीव नाही याचेच आश्चर्य वाटते.

# मराठा आंदोलकांनी आडवली शरद पवारांची गाडी

## मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**

**शरद पवार यांची गाडी मराठा आंदोलकांनी रविवारी सकाळी आडवली. यावेळी मराठा आंदोलकांकडून एक मराठा, लाख मराठा अशी घोषणाबाजी करण्यात आली. शरद पवार यांच्या गाडीच्या समोर येऊन काही मराठा आंदोलक घोषणा देत होते. शरद पवार हे रविवारी बार्शी दौऱ्यावर असताना टेंभुर्णी – कुर्डूवाडी रस्त्यावर हा प्रकार घडला.**



शरद पवार यांची गाडी कुर्डूवाडी जवळ अडवून मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. सकाळी ११ वाजता बार्शीत शरद पवार यांच्या उपस्थितीत मेळावा तसेच नव्याने निवडून आलेल्या खासदारांचा सत्कार होणार होता यासाठी ते निघाले होते. मनसेचे तालुका प्रमुख सागर लोकरे आणि मराठा आंदोलकांनी शरद पवारांची गाडी अडवली होती. मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची आंदोलकांनी मागणी केली. आंदोलकांनी गाडी अडवल्यानंतर पवारांनी कारचा दरवाजा उघडला आणि आंदोलकांचे म्हणणे ऐकले. पवारांनी यावेळी माझा पाठींबा आहे, असे म्हटले. त्यानंतर पवारांची गाडी आंदोलकांनी सोडली.

### लोकांना तुम्ही किती काळ फसवणार – राधाकृष्ण विखे पाटील

मराठा आंदोलकांनी शरद पवारांची गाडी अडवली. याबाबत राधाकृष्ण विखे पाटील यांना विचारले असता ते म्हणाले की, शरद पवार चार वेळेला मुख्यमंत्री राहिले आहेत. मात्र ते आरक्षणाबद्दल का बोलत नाहीत. शरद पवारांची भूमिका दुटप्पी आहे. लोकांना तुम्ही किती काळ फसवणार आहात? आरक्षणाबाबत शरद पवारांनी भूमिका स्पष्ट केलीच पाहिजे. पवारांकडून सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरु आहे, असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे.

## खा.सुप्रिया सुळे यांचा मोबाईल हॅक

पुणेः लोकसभा खासदार सुप्रिया सुळे यांचा फोन आणि व्हॉट्सअप हॅक झाले आहे. त्यांनीच आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरुन यासंदर्भातील माहिती दिली आहे. तसेच कोणीही मला फोन अथवा मेसेज करु नका असे आवाहनही त्यांनी केले आहे. सुप्रिया सुळेंच्या अधिकृत एक्स अकाऊंटवरुन रविवारी दुपारी एक वाजता करण्यात आलेल्या पोस्टमध्ये त्यांनी, ''अत्यंत महत्वाचे'' असे म्हणत मोबाईल हॅक झाल्याची माहिती दिली आहे. माझा फोन आणि व्हॉटस्अप हॅक झाले आहे. कोणीही मला मेसेज किंवा फोन करून नये. याबाबत मी पोलीस तक्रार करत आहे. कृपया याची नोंद घ्यावी, असे सुप्रिया सुळेंनी म्हटले आहे.

# वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने कामगारांना अपघात विमा पावत्यांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने १३ ऑगस्ट रोजी मंगळवारी वितरकांना अपघात विम्याच्या पावत्यांचे वाटप तसेच मृत्यू पावलेल्या पत्रकार आणि वितरकांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात दुपारी ३.३० वाजता होणार असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे .**

गेल्या काही दिवसापूर्वी बीड मधील वितरक रमेश देवळे यांचा पेपर चे वितरण करत असताना अपघाती मृत्यू झाला. ही दुःखद घटना घडल्यानंतर वृत्तपत्र विक्रेता संघटनेने वितरकांचा अपघाती विमा असावा अशी संकल्पना पुढे आणली आणि या संकल्पनेतूनच राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरांमध्ये पेपर वाटप करणाऱ्या सर्व मुलांचा तसेच जिल्ह्यातील सर्व पेपर विक्रेता, प्रेस मधील मशीन विभागात काम करणारे कर्मचारी, संगणक चालक व वितरणामधील सर्व कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा काढून दिला जाणार आहे .याच कार्यक्रमात संपादक नामदेवराव क्षीरसागर ,वितरक रमेश आप्पा बेदरकर ,बाबासाहेब मस्के , पत्रकार सुधाकर सोनवणे यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रमही होणार आहे. या कार्यक्रमाला पत्रकार बांधवांनी आणि संपादकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सुदाम चव्हाण, परमेश्वर खरात, सुमुर्ती वाघिरे, विद्याभूषण बेदरकर ,अमित सासवडे, गणेश भालेकर आदींनी केले आहे.

# शौचालयाच्या दारातच नितेश राणेंच्या पुतळ्याचे दहन

## जरांगेंवरील टीकेमुळे लातूरमध्ये मराठा आंदोलक आक्रमक

**लातूर । प्रतिनिधी**

**भाजप आमदार नितेश राणे यांनी मनोज जरांगे यांच्यावर केलेल्या टीकेनंतर लातूरमध्ये मराठा आंदोलक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. मराठा आंदोलकांनी सार्वजनिक शौचालयासमोरच आमदार नितेश राणेंच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून निषेध केला. यापुढे जरांगे यांच्यावर टीके केल्यास महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशाराही आंदोलकांनी यावेळी दिला.**

मनोज जरांगे हे आधुनिक मोहम्मद जिना आहेत, त्यांच्या आंदोलनाचा फायदा हा मराठ्यांना कमी आणि मुस्लिमांना जास्त झाल्याचे आमदार नितेश राणे म्हणाले होते. त्यामुळे नितेश राणे यांच्या विरोधात लातूरमध्ये मराठा आंदोलक आक्रमक झाले. लातूरमध्ये मराठा आंदोलकांनी नितेश राणे यांना पाळीव कुत्र्याची उपमा दिली. यावेळी संतप्त आंदोलकांनी नितेश राणे यांचा प्रतिकात्मक पुतळा चक्क शौचालयाच्या दारातच दहन केला. यापुढे मनोज जरांगे यांच्यावर जर कोणी टीकाटिप्पणी केली तर त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशाराही यावेळी आंदोलकांनी दिला. मराठा समाज बांधवांनी रेणापूर फाटा या ठिकाणी हे आंदोलन केले. नितेश राणे यांच्या प्रतिकत्मक पुतळ्याचे मराठा आंदोलकांनी दहन करत जोरदार घोषणाबाजी केली.

# पेठ बीड शहर विकास कृती समितीच्यावतीने तिरंगा रॅली

## सहभागी होण्याचे अमृत सारडा यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह संपूर्ण देशभरात शुक्रवार दि.०९ मंगळवार ते भारतीय स्वातंत्र्यदिन गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ यादरम्यान 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' अभियान राबविले जात आहे. संपूर्ण भारत देशात साजरा होणाऱ्या तिरंगा उत्सवात पेठ बीड शहर कृती विकास समितीसह बीडकरांचा मोठा सहभाग लाभणार असून यानिमित्ताने पेठ बीड भागातील बालाजी मंदीर मोंढा रोड येथून मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०वा. भव्य तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. बीड शहरातील महिला पुरुष,युवक, युवती, जेष्ठ नागरिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक संस्था, संघटना, देशभक्त नागरिकांनी या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन पेठ बीड शहर विकास कृती समिती बीडचे संस्थापक तथा माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा, ॅड.शेख शफीक, नगरसेवक खुर्शिद आलम, मुन्ना इनामदार, विष्णू वाघमारे, राणा चौव्हाण सम्राट दादा चौव्हाण, जावेद भैय्या कुरेशी, एकबालभाई, आसाराम भाऊ गायकवाड, अजिंक्य चांदणे प्रेम चांदणे, एडवोकेट श्री राम लाखे, सतिश पवार, सुरेश बनसोडे,यांनी केले आहे.

या तिरंगा रॅलीच्या निमित्ताने चारशे पन्नास फुटाची तिरंगा झेंडा (अखंड पट्टी) देशभक्त नागरिक हातात सन्मानपुर्वक घेत शहरातील विविध भागातून भारत माता की जयच्या घोषणा देत घेऊन जाणार आहेत. तरी शहरातील नागरीकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून देशाभिमान जागृत करावा असे आवाहन पेठ बीड कृती समितीचे मारुती तिपाले, लक्ष्मण शेनकुडे, महेबूब खान, द्वारकादास मुंदडा, बाळासाहेब गुंजाळ, शेख शद्दोभाई, अजिंक्य चांदणे, राजेंद्र बन्सोडे, सादेकभाई जुमा, जयमल्हार बागल, जयंत राऊत, भरतसिंह चुंगडे, रामसिंग टाक, अमोल पौळ, संजय महाद्वार, मिलिंद महाजन, जितेंद्र लोढा, सुशील खटोड, राम इगडे, सुरेश साळुंके, नितीन इगडे, भारत मस्के, लाला बन्सोडे, सतपाल लाहोट, ईश्वर पवार, रणजित शिनगारे, गौतम कांबळे, महेश राठोड, ईश्वर धन्वे, विलास बामणे, संगीताताई बाबरे, कुमार अरुण, विजय पिव्हाळ, रुस्तुम बेदरे, अविनाश बादाडे, प्रभु चांदणे, शेख अतीक, विलास मोमीन, ललीत अब्बड, शेख खलील, संजय घेणे, नंदकुमार येवले, अविनाश जाधव, श्नीमंत गायकवाड, भारत चांदणे, बप्पा जावळे, गुरुप्रसाद पांडे, भागचंद परदेशी, कल्याण रायते, शाम भागवत, प्रभाकर शिंदे, अनिल मुसळे यांच्यासह , पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे.

# पान १वरून...

### शेतकऱ्यांचे उत्पन्न नाही;

याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा झाल्याचे शरद पवार म्हणाले. आज मोदींचे राज्य आहे. अनेक राज्यात त्यांची सत्ता आहे. या सत्तेचा वापर शेतकऱ्यांसाठी केला जात नसल्याचे सांगत त्यांनी सरकारवर टीका केली. लोकसभेला तुम्ही जादू दाखवली. जे लोक सांगत होते ४०० पार त्यांना ३०० पर्यंत देखील जाता आले नाही. सरकार स्थापन करण्यासाठी त्यांना दुसऱ्यांची मदत घ्यावी लागली असे शरद पवार म्हणाले. ओमराजेंना ५० हजार पेक्षा अधिक मतांचा लीड बार्शी तालक्याने दिली आहे, त्याबद्दल तुमचे आभार असल्याचे शरद पवार म्हणाले. बार्शी तालुका हा डाळ, तूर या सर्वांच्या व्यवहारासाठी प्रसिद्ध असल्याचे शरद पवार म्हणाले. एक काळ असा होता या भागात कापूस यायचा. येथील कापड गिरण्या प्रसिद्ध होत्या असेही शरद पवार म्हणाले. या तालुक्याने अनेक नेतृत्व देण्याचे काम केले असल्याचेही पवार म्हणाले.

---------

### हिंडेनबर्गच्या अहवालानंतर

आपला अहवाल प्रसिद्ध केला होता. मात्र सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी–बूच यांनी अदानी समूहावर कोणतीही कारवाई केली नाही. यामुळे या घोटाळ्यात सेबीच्या प्रमुख माधवी यांचाही हात असल्याचा आरोप हिंडेनबर्गने आपल्या नवीन अहवालात केला आहे. काँग्रेसशिवाय तृणमूल काँग्रेसने सेबी प्रमुखांना कोंडीत पकडले आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांनीही एक्सवरील पोस्टमध्ये उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी या घोटाळ्याला अदानी स्टाईल म्हणत आरोप केला की, सेबीचे अध्यक्षही त्यांच्या समूहातील गुंतवणूकदार आहेत. क्रोनी भांडवलशाही शिगेला पोहोचली आहे. महुआ यांनी केंद्रीय तपास संस्था सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालयाच्या संचालकांना टॅग केले आणि विचारले की हिंडेनबर्गचा नवा अहवाल आल्यानंतर गुन्हा दाखल केला जाईल आणि पीओसीए कायदा आणि पीएमएलए (मनी लाँड्रिंग प्रतिबंध कायदा) अंतर्गत तपास केला जाईल का ? असा सवाल केला आहे.

**माधवी बूच यांनी केले आरोपाचे खंडन**

सेबीच्या प्रमुख माधवी पुरी–बूच आणि त्यांचे पती धवल यांनी हिंडेनबर्गच्या नवीन अहवालावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, १० ऑगस्ट २०२४ च्या हिंडेनबर्ग अहवालात आमच्यावर अनेक आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांचे आम्ही जोरदार खंडन करतो. या आरोपात कोणतेही तथ्य नाही. आमचे जीवन आणि आर्थिक व्यवहार हे खुल्या पुस्तकासारखे आहेत. वर्षानुवर्षे आवश्यक असलेले सर्व खुलासे आधीच सेबीकडे सादर केले गेले आहेत, आम्हाला कोणतीही आर्थिक कागदपत्रे उघड करण्यास संकोच नाही, असे माधवी यांनी म्हटले.

-------------

### बीडचे भगवे वादळ आज मुंबईत

जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक यांनी दिली. बीड जिल्ह्यामध्ये उबाठा गटाला एकामागून एक धक्के बसत असून युवासेना पदाधिकाऱ्यांसह महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष व महिला कार्यकर्त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. दि. १२ ऑगस्ट रोजी बीडचे भगवे वादळ मुंबईत धडकणार असून जिल्हाप्रमुख अनिल जगताप आणि सचिन मुळूक यांच्यावतीने मोठे शक्तीप्रदर्शन करण्यात येणार आहे. उबाठा गटाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड संगीता चव्हाण व सर्व महिला पदाधिकारी, युवासेना जिल्हाप्रमुख ॲड रवीराज बडे, गजानन कदम आणि त्यांच्या सर्व समर्थक कार्यकर्त्यांचा दि. १२ ऑगस्ट रोजी रात्री ८.०० वाजता नंदनवन निवास्थान मुंबई येथे मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते यांच्या प्रमुख उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप आणि सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश होणार आहे. या प्रवेश सोहळ्याकरिता बीड जिल्ह्यामधून चारशे गाड्यांचा ताफा मुंबई येथे दि.१२ रोजी सकाळी ७.०० वाजता रवाना होणार असून तब्बल २००० महिला आणि युवकांचा शिवसेनेत जाहीर होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिली आहे.

------------------

### गेवराईत वेगळ्या राजकीय

धमाकेदार विजय मिळवून बी.आर.एस. पक्षाचा झेंडा फडकावला होता. तसेच यानंतर देखील तालुक्यात गाव तेथे कार्यकर्त्यांची फळी तयार करून पक्ष संघटन मजबूत केले होते. त्याचबरोबर मागील काही वर्षापासून गाव तेथे मोफत आरोग्य शिबिर राबवून लाखो नागरिकांच्या तपासणीसोबतच हजारो रुग्णांच्या डोळ्याची मोफत यशस्वी शस्त्रक्रिया मस्के दाम्पत्यांनी करुन राजकारणाबरोबरच समाजकारण देखील केले आहे. त्यामुळे सामाजिक कामातून मस्के दाम्पत्यांनी मतदारसंघातील गावागावात आपली ओळख निर्माण केलेली आहे. दरम्यान गेवराई मतदार संघात पक्ष संघटन मजबूत असताना देखील पक्षाच्या वरिष्ठांकडून लोकसभा निवडणुकीच्या वेळी भुमिका स्पष्ट केकेली नव्हती, तसेच दोन महिण्यांवर विधानसभा येऊन ठेपली असताना देखील पक्ष भुमिका स्पष्ट करत नसल्याच्या नाराजीतून मयुरीताई मस्के–खेडकर यांनी बी.आर.एस. समन्वयक पदाचा राजीनामा पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार शंकर आण्णा घोंगडे यांच्याकडे सुपूर्द केला आहे. यामुळे हा बी.आर.एस. पक्षाला मोठा धक्का लागला असून मस्के दाम्पत्य आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कोणती भूमिका घेतात, याकडे गेवराई मतदार संघातील जनतेचे लक्ष लागले आहे.

---------

### नेत्याच्या उमेदवारीसाठी

यांनी अजित पवार गटात जाणे पसंत केले. त्यांची ही भूमिका तालुक्यातील शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ असलेल्या असंख्य कार्यकर्त्यांना पटली नाही. माजलगाव तालुका हा शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिलेला तालुका आहे. मात्र आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी रनिंग आमदार प्रकाश सोळंके हे अजित पवार यांच्यासोबत गेले. मात्र आमदार गेले असले तरी मतदारसंघातील असंख्य कार्यकर्ते जे शरद पवार यांच्यावर प्रेम करतात त्यांनी पवारांचे हात बळकट करण्यासाठी जीवतोड मेहनत घेतली. माजलगाव मतदार संघासह जिल्ह्यातही अशीच परिस्थिती राहिली आणि सामान्य जनतेच्या बळावर कार्यकर्त्यांनी जे प्रयत्न केले त्याला यश आले आणि लोकसभेत शरद पवार यांच्या पक्षाचे बजरंग सोनवणे हे खासदार म्हणून निवडून आले. हे जिल्ह्यासाठी शरद पवारांच्या कार्यकर्त्यांसाठी मोठे यश मानले जात आहे. आता विधानसभा निवडणुका येऊ घातल्या असून, शरद पवार यांना राज्यात भेटलेले लोकसभेतील यश पाहता, अनेकजण त्यांना उमेदवारीची गळ घालत आहेत. बीड जिल्ह्यातील मतदार संघासह राज्यभरात हेच चित्र दिसत आहे. माजलगाव मतदारसंघ हा शरद पवार यांच्या विचारावर चालणारा आहे, यामुळे या ठिकाणी येत्या विधानसभेत शरद पवार यांच्या उमेदवाराला निवडून येण्याची मोठी संख्या आहे. हेच लक्षात घेऊन अनेकजण माजलगाव मतदार संघातून लढण्यास इच्छुक आहेत. मात्र शरद पवार यांच्यासोबत एकनिष्ठ असलेले आणि विपरीत काळातही साथ न सोडणारे पवार यांचे कार्यकर्ते यांनी यंदा निष्ठावंतालाच उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी केली आहे. मतदार संघातील शेकडो कार्यकर्त्यांनी ज्येष्ठ नेते आणि शरद पवार यांच्यासोबत पहिल्यापासून एकनिष्ठ असलेले नारायणअण्णा डक यांना उमेदवारी देण्याची मागणी केली आहे. यासाठी मतदारसंघातील शेकडो कार्यकर्त्यांनी स्टॅम्प पेपरवर अक्षरशः एकनिष्ठतेचे शपथ पत्र लिहिले असून, ते पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे दिले आहे. कोणत्याही ऐऱ्यागैऱ्याला तिकीट न देता ते निष्ठावंताला देण्यात यावे, अशी रास्त मागणी या शेकडो कार्यकर्त्यांनी केली आहे. पक्षश्रेष्ठी याबाबत काय निर्णय घेते याकडे आता मतदारसंघातील नेते, आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

**नारायण डक आणि एकनिष्ठता...**

माजलगाव विधानसभेचे पक्षाचे अध्यक्ष असलेले नारायणअण्णा डक हे शरद पवार यांचे एकनिष्ठ म्हणून ओळखले जातात. नारायणअण्णा यांचे वडील माजी आमदार गोविंदराव डक आणि शरद पवार यांचे संबंध अख्या महाराष्ट्राला ठाऊक आहेत. १९८० च्या काळामध्ये गोविंदराव डक यांनी त्यावेळी अत्यंत प्रसिद्ध असलेल्या उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांचा विधानसभेत पराभव केला. त्यामुळे ही निवडणूक आणि गोविंदराव हे अख्या महाराष्ट्रात प्रसिद्ध पावले. त्यावेळी गोविंदरावांच्या पाठीमागे मतदारसंघातील सामान्य जनता उभी राहिली होती. तेव्हापासूनच गोविंदराव यांचे थोरले चिरंजीव असलेले नारायण अण्णा हे शरद पवार यांच्या विचाराने प्रभावित झाले आणि तेव्हापासून आजपर्यंत ते पवार यांच्याच विचारावर कार्य करतात. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अनेकांनी पवार यांचे आपण एकनिष्ठ आहोत असे दाखविले मात्र, विरोधकांना सहकार्य केले. ही बाब आता लपून राहिली नसून शरद पवार यांच्यापर्यंत हे सगळे गेले आहे. शरद पवार यांनी सुद्धा एका कार्यक्रमात माजलगाव मध्ये १९८० ची पुनरावृत्ती करू, असे म्हटले आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या विचारांशी एकनिष्ठ असलेले नारायणअण्णा डक यांनाच उमेदवारी द्यावी अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. कार्यकर्त्यांच्या या भावनेचा पक्षश्रेष्ठी आदर करणार का ? याबाबत आता उत्सुकता लागली आहे.

------------

### जम्मू–काश्मीरात अडीच

माहिती लष्कराला मिळाली त्यामुळे शोध मोहीम सुरुच ठेवण्यात आली होती. सुरक्षा दलांनी या संपूर्ण परिसराला घेराव घातला आहे, त्यामुळे दहशतवाद्यांना पळून जाण्याचा कुठलाही मार्ग नाही. लष्कर, निमलष्करी दल आणि राज्य पोलिसांची फौज या परिसरात तैनात केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या काही महिन्यांपासून जम्मू–काश्मीरच्या विविध भागात दहशतवाद्यांकडून सातत्याने हल्ले होत आहेत. दहशतवादी सुरक्षा दलासोबतच सामान्य नागरिकांनाही लक्ष्य करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जम्मू–काश्मीरमध्ये गेल्या ७८ दिवसांत ११ दहशतवादी हल्ले झाले आहेत.

-----------

### विनेशचा निकाल १३

विनेश फोगाटला ऑलिम्पिकमधून अपात्र केल्याच्या विरोधात केलेल्या अपिलावर आंतरराष्ट्रीय क्रीडा लवादाकडून निर्णय दिला जाणार आहे. तिच्या बाजुने निकाल आला तर तिला सुवर्ण पदक मिळण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेसाठी क्रीडा लवादाकडून फोगाटला तीन प्रश्न विचारण्यात आले आहेत. या प्रश्नांचे उत्तर फोगाटला १२ ऑगस्टपर्यंत द्यायचे आहे. विनेश फोगाटला क्रीडा लवादाकडून मेल करण्यात आला आहे. यामध्ये काही प्रश्न विचारण्यात आले असून त्याची उत्तरे मागविण्यात आली आहेत. यापैकी पहिला प्रश्न असा आहे की, दुसऱ्या दिवशीही तुम्हाला स्वत:चे वजन करावे लागते हा नियम तुम्हाला माहीत होता का? दुसरा प्रश्न सध्याची रौप्य पदक जिंकणारी क्यूबन कुस्तीपटू तिचे रौप्य पदक तुमच्यासोबत शेअर करेल का? आणि तिसरा प्रश्न या अपीलचा निर्णय सार्वजनिक किंवा गोपनीय पद्धतीने तुम्हाला कळवला जावा असे तुम्हाला वाटते का? असे विचारण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा लवादाकडून विनेश फोगाटसह भारताच्या बाजूने निकाल लागणार का? ते पाहण्याजोगे असेल. हा निकाल सकारात्मक असेल, असा विश्वास भारतीय ऑलिम्पिक समितीने व्यक्त केला आहे. विनेश फोगाट हिने संबंधित याचिकेच्या माध्यमातून संयुक्त रौप्य पदक मिळावे, अशी विनंती केली आहे. जर निकाल तिच्या बाजूने लागला तर भारताच्या खात्यात आणखी एका रौप्य पदकाची भर पडेल.

----------

### सुरेश धस यांच्या जनसंवाद

दौलावडगाव व सावरगाव मायंबा या ठिकाणी आयोजित जनसंवाद मेळाव्या प्रसंगी बोलत होते. माझा कार्यकर्ता मी सत्तेत असो अथवा नसो परंतु तो कधीच कोणाच्या दारात गेला नाही हे अभिमानाने मला सांगत त्यांचे आभार मानावे वाटतात.असे जीवाचे माणसे गोळा करण्यासाठी रात्रंदिवस त्यांच्या सेवेत राहुन काम आणि जनतेच्या सेवेत राहावे लागते रात्री अपरात्री जरी दवाखाना,अपघात इतर कोणत्याही बाबीसाठी फोन आला तर मी आणि माझं धस कुटुंबीय तेवढेच तत्पर असल्यानेच एका मॅसेजवर जनता गोळा होते. कोरोना काळात किंवा इतर वेळेस हे आजी–माजी आमदार होते कुठे. गेल्या पाच वर्षात आता निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने आजी–माजींनी निवडणुकीच्या तोंडावर गाव भेटी दौरे सुरू केले आहेत. कोरोना काळात ३३ विलगीकरण केंद्र व १३ कोविड सेंटर चालवत अनेकांना जीवदान देण्याचे काम माझ्या हातून झाले आहे आणि त्या काळात रात्रंदिवस मी जनतेसाठी काम जनसेवा करण्याचं काम करत होत.कोरोना काळात औषध पेक्षा आधार देण्याची जनतेला आवश्यकता होती ते काम मी प्रामाणिकपणे केले.कोरोना काळात ३३ ठिकाणी विलगीकरण १३ हॉस्पिटल चालवले जीव वाचवले त्यावेळेस मतदार संघाचे आमदार व माजी आमदार कुठं होते ,,? असा सवाल देखील धस यांनी उपस्थित केला.यावेळी लोणी येथील मेळाव्यास जि.प.सदस्य दतोबा वाडेकर,भाजपा जेष्ठ नेते रमेश ढगे, जयशिंग गव्हाणे,माजी उपसभापती गोपाळभाऊ रक्ताटे,सरपंच संजय रक्ताटे, उद्धव मोढवे पाटील,हनुमंत जंजिरे,अनिल गलांडे,शिवा पाटील वाळके,रामदास शेंडगे,बबन परकाळे, मनोज थोरवे, मयूर मोंढवे,नामदेव सायंबर,कृष्णा काकडे, बाबा मुठे,सरपंच सोमनाथ वाडेकर, राहुल सुरवसे,भवर सर,योगेश शेळके, राजु खुरांगे, दत्ता शेळके, सरपंच विकास अमृते, तर दौलावडगाव येथील मेळाव्यास व्यासपीठावर माजी सभापती अशोक इथापे,सिद्धेश्वर ढोले,माजी सरपंच महेबूब शेख,विठ्ठल नाना अकोलकर, कारखेल सरपंच रघुशेठ घुले,केळ सरपंच सचिन दळवी, दौला वडगाव उपसरपंच बिबीशन दहातोंडे,वहाब पटेल,चेअरमन भास्कर थोरात,माजी सरपंच सचिन घुले,माजी सरपंच अशोक दहातोंडे, सालेवडगाव सरपंच महेश कराळे,माजी सरपंच शिवाजी थोरात, सावरगाव मायंबा येथील मेळाव्यास उपजिल्हाधिकारी पर्यटन विभाग संभाजीनगर जाधव साहेब,भाजपा तालुकाध्यक्ष अॅड.साहेबराव म्हस्के,अध्यक्ष दादासाहेब चितळे,बाबासाहेब म्हस्के,ताठे पाटील साहेब, सरपंच पंढरीनाथ चंदनशिव,सरपंच पती मल्हारी शिंदे, पिंपरी (घाटा) सरपंच मोहन आमटे,सरपंच शेडाळा जावेद शेख, बुवासाहेब शेकडे, उपसरपंच गणेश वायभासे, शाम आबा तळेकर, माजी जि. प.सदस्य रावसाहेब शिरसाठ,माजी उपसभापती रमेश तांदळे, आदींसह पंचक्रोशीतील नागरिक,कार्यकर्ते, पदाधिकारी आदी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------

### कर्मचारी जाणार संपावर

घेण्यात आला. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीचे मुख्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी या संपाची माहिती दिली.

विश्वास काटकर म्हणाले, महाराष्ट्रातील १७ लाख सरकारी, निम सरकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जातील, असा निर्णय मुंबई येथील समन्वय समितीच्या विस्तारीत सभेत झाला. राज्य सरकारने पेन्शनबाबत जे आश्वासन दिले ते अद्याप पाळण्यात आलेले नाही. सामाजिक आणि आर्थिक सुलक्षण म्हणून जुन्या पेन्शन प्रमाणे पेन्शन मिळेल, असे आश्वस्त करुन सुद्धा त्या संदर्भातील नोटीफिकेशन निघू शकलेले नाही. त्यामुळे सर्व कर्मचारी, शिक्षक हे चिंतेत आहेत, असे विश्वास काटकर म्हणाले. राज्य सरकारने तात्काळ नोटिफिकेशन काढण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच नोटिफिकेशन निघत नाही तोपर्यंत संप सुरु ठेवण्याचा निर्धार संबंधित कर्मचारी संघटनेने केला आहे.

----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ११ ऑगस्ट २०२४


# सुरुडी आश्रम शाळेला आदिवासी विकास विभागाचा उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार प्रदान



म्हसोबावाडी। प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्प अधिकारी श्रीमती देवकन्याजी बोकडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले आष्टी तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी या शाळेची आदिवासी विकास विभागातील ''उत्कृष्टआश्रमशाळा'' म्हणून निवड करण्यात आली आहे. यावेळी सुरेश वानखेडे, अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग अमरावती यांच्या हस्ते एस. पी. राठोड मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी हे ''उत्कृष्ट आश्रमशाळा'' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पत्रकार संवाद यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याची वृत्तपत्र दिंडीने सुरूवात

## छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात उद्या प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) लोकशाहीच्या बळकटीसाठी, पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दि.२८ जुलैपासून सुरू झाली आहे. दुसर्या टप्याची सुरूवात छत्रपती संभाजीनगर येथून १३ ऑगस्ट रोजी वृत्तपत्र दिंडीने होणार आहे. ऐतिहासिक क्रांती चौकातून सकाळी १० वाजता यात्रेला सुरूवात होईल. त्यावेळी वृत्तपत्रे विक्रेते, संपादक, पत्रकार व विविध सामाजिक राजकीय संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत अशी माहिती छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभु गोरे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली वृत्तपत्र व पत्रकारांच्या मागण्या सरकारला सांगण्यासाठी आणि राज्यभरातील पत्रकारांच्या विषयावर जनजागृती करण्यासाठी दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २८ जुलै पासून सुरू झाली आहे. पहिल्या टप्यात विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पंधरापेक्षा अधिक जिल्ह्यातुन या यात्रेने प्रवास केला आहे. पत्रकारांचा आणि विविध सामाजिक संस्थांचे मोठे समर्थन यात्रेला मिळाल्याने पत्रकारांच्या या यात्रेचे वादळ घोंगावू लागले आहे. दुसर्या टप्यातील यात्रेचा शुभारंभ १३ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरमधील ऐतिहासिक क्रांती चौकातून होणार असुन मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, पुणे, कोकण, ठाणे विभागातून ही यात्रा २० ऑगस्ट रोजी मुंबईत मंत्रालयावर जाणार आहे. यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडी निघणार आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्यासह सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघाचे पदाधिकारी सदस्य आणि विविध सामाजिक राजकीय संस्थांचे प्रतिनिधी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या शुभारंभाला जास्तीत जास्त पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे, वर्तमानपत्र विकेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष नीलेश फाटके, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, उपाध्यक्ष छबूराव ताके, संघटक विलास शिंगी, महानगर अध्यक्ष अनिल सावंत, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, वर्तमान पत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष काकासाहेब मानकापे, सचिव गणेश भोसले, कार्याध्यक्ष शेख फईम, उपाध्यक्ष अण्णासाहेब जगताप, प्रसिद्धी प्रमुख भीमराव वायभट, शिवाजी ढेपले यांनी केले आहे.

### वर्तमानपत्र विक्रेता संघटनेच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडी

पत्रकार संवाद यात्रेच्या दुसर्या टप्प्याचा शुभारंभ छत्रपती संभाजीनगर वर्तमानपत्र विक्रेता संघटनेच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडीने होणार आहे. या वृत्तपत्र दिंडीत सर्वच वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे संपादक, वृत्तपत्र विक्रेते, पत्रकार, राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरीकांचा सहभाग राहणार आहे.



बीड : शिवसेना जनसंपर्क कार्यालय बीड येथे शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख बाळासाहेबजी अंबुरे यांचा वाढदिवस साजरा केला.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.. यावेळी शहर प्रमुख शेख निजाम भाई,उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,उपजिल्हाप्रमुख आशिष भैय्या मस्के, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, युवासेना शुभम भैय्या डाके, दिपक घोडके पाटील,अजय गायकवाड आदी सर्व उपस्थित होते..!!

# पालकमंत्री धनंजय मुंडेंनी अमर नाईकवाडेंवर सोपवली नवी जबाबदारी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या बीड विधानसभा क्षेत्र अध्यक्षपदी झाली निवड**

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत तालुकास्तरीय समिती गठित करण्यात आल्यानंतर या समितीच्या अध्यक्षपदी बीड नगरपरिषदेचे अभ्यासू नगरसेवक तथा जनतेचे प्रश्न उभे राहून सोडवण्यासाठी प्रयत्न करणारे नेतृत्व असलेले अमर नाईकवाडे यांची निवड करण्यात आली होती. दरम्यान आता शासनाकडून अमर नाईकवाडे यांच्याकडे नव्याने विस्तारित जबाबदारी सोपवली आहे. त्यांची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या बीड विधानसभा क्षेत्र अध्यक्षपदी निवड करत कामाप्रति सजग असलेल्या नगरसेवकाचा एकप्रकारे सन्मान केला आहे.



राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या योजनेच्या बीड विधानसभा क्षेत्र अध्यक्षपदी नगरसेवक अमर मारुती नाईकवाडे यांची निवड केली आहे. दरम्यान तर इतर ९ सदस्यांची ही पालकमंत्री मुंडे यांच्या शिफारशीनुसार समितीमध्ये निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल अमर नाईकवाडे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी आ.अमरसिंह पंडित,वाल्मीक कराड, अविनाश नाईकवाडे, फारुख पटेल यांचे आभार मानले आहेत.

महिलांचे आरोग्य पोषण आणि त्यांचे आर्थिक स्वावलंबनासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांचा सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी असल्याने त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझी लाडकी बहीण योजना सुरू केलेली आहे. या योजनेच्या तालुकास्तरीय समित्या गठित करण्याचे निर्देश दिल्यानंतर आता राज्य शासनाने विधानसभा क्षेत्रनिहाय अध्यक्ष नियुक्त केले जात आहेत. यानुसार पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड विधानसभा क्षेत्र समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक अमर नाईकवाडे यांची नियुक्ती केली आहे, तर सदस्य म्हणून मुख्याधिकारी न.प.बीड, गटविकास अधिकारी पं.स.बीड, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,बीड, बालविकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण, क्र.१ व क्र.२, पर्यवेक्षिका बाल विकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण बीड, सरंक्षण अधिकारी (कनिष्ठ)ता.बीड यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सचिन मुळूक व सचिन जाधव यांची अशासकीय सदस्यपदी तसेच बीडचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांची या समितीच्या सदस्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी मराठी पत्रकार परिषदेची पुण्यात बैठक

पुणे /प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेची पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा पुण्यात होणार असून या कार्यशाळेत यु ट्यूब,पोर्टल चे संपादक व सर्व पत्रकारांसाठी खास आकर्षण असणार आहे. गुगल आणि यु ट्यूब कडून बेनिफिट मिळण्यासाठी काय करावे लागणार या दृष्टीने देखील अत्यांत महत्वाचे मार्गदर्शन लाभणार आहे. एकंदरीतच ही पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे सर्वेसर्वा मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या उपस्थितीत पुण्यामध्ये बैठक घेण्यात आली. तसेच संबंधितांना योग्य त्याा सूचना देण्यात आल्या.

बैठकीमध्ये मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे,मराठी पत्राकार परिषदेचे पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशे,पिंपरी चिंचवड पत्राकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले,कार्याध्यक्ष अविनाश आदक,उपाध्यक्ष सुरज साळवे, डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष महावीर जाधव,विनय सोनवणे, राजकुमार शेंडगे,पराग डिगनकर, पुणे जिल्हा समन्वयक मारुती बाणेवार,सागर सूर्यवंशी नितीन कालेकर,किसन भोसले, रमेश साठे सह आदींची उपस्थिती होती.



# दलित समाजाला योजनापासून वंचित व हक्कापासून दूर ठेवणाऱ्या आमदाराला बदला –आ.अमित गोरखे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित विधान परिषदेचे सदस्य तथा अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे यांनी घनसावंगीतील दलित, वंचित घटकांच्या सामाजिक परिस्थितीची पाहणी केली. या पाहणीत दलित वंचित समाज हा शासकीय योजनापासून वंचित असल्याचे त्यांना दिसून आल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे आमदार राजेश टोपे यांनी पंचवीस वर्षात दलित मातंग समाजाचा फक्त मतासाठी वापर झाला, अशा शब्दात त्यांनी राजेश टोपेवर टीका केली. तसेच येणाऱ्या काळात दलित वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष मातंग समाजाचे उच्चशिक्षित युवा नेते यांची विधान परिषदेवर निवड झाली आहे. त्यांनी मराठवाड्यातील दलित, वंचित आणि मातंग समाजाचे प्रश्न जाणून घेण्यासाठी दौरा सुरू केलेला आहे. शनिवारी अमित गोरखे यांनी घनसावंगी मतदारसंघातील दलित वंचित घटकाच्या विविध गावांना भेटी देऊन त्यांचे प्रश्न जाणून घेतले. या भेटीत त्यांना दलित समाजातील अनेक घटकांना घरकुलाचा लाभ देखील मिळू शकलेला नाही. अनुसूचित जाती जमातीच्या जनतेसाठी महायुती सरकारने राबवलेल्या अनेक योजना या त्यांचापर्यंत पोहचू शकल्या नसल्याचे दिसले. एक लोकप्रतिनिधी म्हणून अनुसूचित दलित वंचित समाजाला शासकीय योजनापासून, घरकुलापासून वंचित ठेवनारा लोकप्रतिनिधी असेल तर त्याला बदलवण गरजेचे आहे. येणाऱ्या काळात सरकारच्या माध्यमातून घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक दलित, वंचित घटकाला शासनाच्या योजना त्यांच्या दारापर्यंत नेण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाजपा नेते सतीश घाटगे, भाजपा अनुसूचित जाती-जमाती मोर्चाचे उपाध्यक्ष सर्जेराव जाधव यांची उपस्थिती होती.

महायुती सोबत राहण्याचे आवाहन

सतीश घाटगे यांनी प्रत्येक घटकसाठी केलेल्या कार्याचा अमित गोरखे यांनी कौतुक केले. अनुसूचित जाती जमाती च्या घटकांना त्यांचे प्रश्न सोडवून घेण्यासाठी महायुती एकमेव पर्याय आहे. येणाऱ्या काळात महायुती सोबत राहण्याचे आवाहन त्यांनी घनसावंगी विधानसभेतील जनतेला केले.

# ए.जे.बोराडे यांना परतुर विधानसभेची उमेदवारी द्यावी –कार्यकर्त्यांची पक्षश्रेष्ठींकडे मागणी

मंठा । प्रतिनिधी

परतुर मंठा विधानसभा मतदारसंघातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांना उमेदवारी द्यावी अशी आक्रमक मागणी केली. उबाठा शिवसेनेच्या जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती जालना येथील शिवसेना भवनात शनिवार ता. ११ रोजी घेण्यात आल्या. यावेळी जालना - संभाजीनगर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना नेते मा. खासदार चंद्रकांत खैरे, माजी आमदार शिवाजीराव चोथे, संतोष सांबरे, जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर, जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे, हिकमत उढाण, मनीष श्रीवास्तव, रमेश गव्हाड, अंकुशराव अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती. परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परतूर - मंठा विधानसभा मतदारसंघातून जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे यांना उमेदवारी द्यावी अशी आग्रहाची मागणी केली.



जालना मतदारसंघातून भास्करराव आंबेकर, बदनापूर मतदारसंघातून माजी आमदार संतोष सांबरे, भोकरदन मतदारसंघातून मनीष श्रीवास्तव आणि रमेश गव्हाड, तर घनसावंगी मतदारसंघातून हिकमत उढाण यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. ए जे बोराडे हे मागील तीस वर्षापासून शिवसेनेशी एकनिष्ठ असून शिवसेना उपतालुकाप्रमुख, तालुकाप्रमुख, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण सभापती, जिल्हा नियोजन समिती सदस्य आदी पदावर कार्य केले असून आजही मंठा बाजार समितीचे सभापती म्हणून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देतात. मंठा नगरपंचायत सह पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच अनेक ग्रामपंचायती व सोसायटी शिवसेनेच्या ताब्यात आहेत. सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी भरीव असे कार्य केले आहे. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली परतुर - मंठा - नेर -सेवली भागामध्ये शिवसेनेचे त्यांनी प्रचंड जाळे निर्माण केले आहे. त्यांना पक्षाने उमेदवारी दिल्यास त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी मुलाखतीदरम्यान केला.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत जिल्हयातील बेरोजगार युवक युवतींना विविध शासकीय, निमशासकीय आस्थापना, उदयोग, विविध बँकांमध्ये ऑन जॉब प्रशिक्षण संधी

**बीड । प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या विद्यमाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना करिता बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण उमेदवारांकरिता ऑनलाईन व ऑफलाइन नोंदणीचे व निवडी करीता मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय व खाजगी आस्थापना, सहकारी बैंक, साखर कारखाने इत्यादी मध्ये सहा महिने ऑन जॉब ट्रेनिंग घेणे करिता नोंदणी सुरू आहे. जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र बीड मार्फत दिनांक १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था मुलींची बीड येथे ''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे.

यामध्ये नोंदणी केल्यानंतर आस्थापनेच्या आवश्यकतेप्रमाणे निवड झाल्यास बारावी उत्तीर्ण उमेदवारांना दरमहा ६०००, आयटीआय व डिप्लोमा करिता ८०००, पदवी व पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण बेरोजगारांकरिता १०००० विद्यावेतन आणि सहा महिने सदर कार्यालयात, आस्थापनेत, कंपनीत, बँक मध्ये प्रशिक्षण पूर्ण केल्यास प्रशिक्षणसह प्रमाणपत्र देण्यात येईल.

आस्थापनेचे नाव, पदाचे नाव, शैक्षणिक पात्रता, वय, एकुण जागा खालील प्रमाणे आहेत.

१) जयभवानी सह. साखर कारखाना लि. गेवराई शिक्षण-आय.टी.आय. वेल्डर / फिटर/ इलेक्ट्रेशिअन वय-१८ ते ३५ एकुण जागा-४४

२) जि. मध्यवर्ती सह. बैंक कार्यालय बीड पद- सहायक शिक्षण - बी. कॉम पदवीधर वय १८ ते ३५ एकुण जागा- ५२

३) पुर्णवादी बँक बीड पद-लिपीक शिक्षण- बी. कॉम पदवीधर वय १८ ते ३५ एकुण जागा-२८

४) गजानन बैंक बीड पद- शिक्षण- लिपीक बी. कॉम पदवीधर वय- १८ ते ३५ एकुण जागा ०६

५) कृष्णा बैंक बीड पद-लिपीक शिक्षण- बी. कॉम पदवीधर वय १८ ते ३५ एकुण जागा-१३

६) महिला व बालविकास विभाग पद-ऑफिस असिसंटट शिक्षण पदवीधर वय १८ ते ३५ एकुण जागा-०६७) जिल्हा मत्स अधिकारी बीड पद- ऑफिस असिसंटट शिक्षण पदवीधर वय १८ ते ३५ एकुण जागा-०१ ८) जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र बीड पद - ऑफिस असिसंटट शिक्षण -पदवीधर वय-१८ ते ३५ एकुण जागा-०१

९) प्रियदर्शनी महिला बैंक बीड पद - लिपीक शिक्षण - बी. कॉम वय १८ ते ३५ एकुण जागा-०७

१०) जि.प विविध विभाग बीड पद- लिपीक शिक्षण पदवीधर वय १८ ते ३५ एकुण जागा-१२

११) राज्य परिवहन महामंडळ पद-स्टोअर कीपर, ऑफिस असिसंटट , शिक्षण - आय टी आय ,पदवीधर वय-१८ ते ३५ एकुण जागा - १४०

१२) नगरपरिषद बीड कार्यालय, पद-सहायक शिक्षण पदवीधर वय-१८ ते ३५ एकुण जागा-०५

वरील एकूण ३१५ जागा सध्या स्थितीत उपलब्ध आहेत यात आवशक्ते प्रमाणे बदल होऊ शकतो.

याकरिता दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी शासकीय औद्योगिक

पान ६ वरून...

## चारा -पाण्यावाचून कोंडवाड्यातील

उघड्यावर असलेल्या कोंडवाड्यामध्ये चिखलासह कमालीची घाण असते. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था नसल्याने भुकेमुळे जनावरांचा मृत्यू होत आहे. बारा दिवसांपूर्वी बीड शहरातील शहर पोलीस ठाण्याच्या बाजूला असलेल्या कोंडवाड्यामध्ये एका गर्भवती गाईचा आणि तिच्या पिलाचा चारा आणि पाण्याविना मृत्यू झाला. ही घटना २९ जुलैला घडली. जर कोंडवाडे बंद करून नगरपालिका आणि नगरपंचायत यांच्या वतीने पकडण्यात येणारी मोकाट जनावरे जिल्ह्यातील विविध भागात असलेल्या गोशाळांना संगोपनासाठी दिली तर किमान त्यांचा जीव वाचेल याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका आणि नगरपंचायत यांना देण्यात यावा अन्यथा स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालय किंवा नगरपालिकेसमोर आत्मदहन करण्याचा इशारा पुरणदास मठ संस्थान गोशाळेचे सचिव रामेश्वर उर्फ रंजीत सदाशिव पवार यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.


# पाहिजेत

**कै.विष्णाजी पाटील सरोदे शिक्षण प्रसारक मंडळ मंठा संचलित व श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई संलग्नित गंगा-भागीरथी महिला आर्ट, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय मंठा ता.मंठा जि.जालना विनाअनुदान तत्वावर खालील पदे भरावयाची आहे.**

| पद | शैक्षणिक पात्रता | विषय | पदसंख्या |
|---|---|---|---|
| प्राचार्य | एम.ए./एम.कॉम/एम.एस्सी. पीएचडी/नेट-सेट | - | ०१ |
| सहाय्यक प्राध्यापक | एम.ए.नेट-सेट/पीएचडी | इंग्लीश, हिंदी, मराठी, संस्कृत, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, समाजशास्त्र | प्रत्येक विषयास एक पद |
| सहाय्यक प्राध्यापक | एम.कॉम.नेट-सेट/पीएचडी | सचिवीय सराव आणि कार्यालय व्यवस्थापन, पर्यटन आणि प्रवास व्यवस्थापन, विपणन व्यवस्थापन, कंपनी कायदा, आर्थिक लेखा आणि ऑडिटिंग, खर्च संगणक अनुप्रयोग, अकाउंटन्सी आणि फायनान्स | प्रत्येक विषयास एक पद |
| सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी नेट-सेट/पीएचडी | गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र | प्रत्येक विषयास एक पद |
| शा.शि. निर्देशक | एम.पी.एड नेट-सेट/पीएचडी | --- | ०१ |
| ग्रंथपाल | पदवीधर एम.लिब | --- | ०१ |
| व लिपिक आणि क.लिपीका | पदवीधर MSCIT | --- | ०१<br>०१ |
| संगणक प्रशिक्षक | BSC Computer, MSCIT | --- | ०१ |
| ग्रंथपाल परिचर | पदवीधर बी.लिब | --- | ०१ |
| प्र.सहाय्यक | १२ वी विज्ञान | --- | ०१ |
| सेवक | दहावी/बारावी | --- | ०२ |

टिप : शासनाच्या निकषाप्रमाणे अनुशेष पूर्ण करण्यात येईल. पात्र उमेदवारांनी मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने दि.२५-०८-२०२४ रोजी सकाळी ठिक ११.००० वा. गंगा-भागीरथी महिला आर्ट, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय मंठा ता.मंठा जि.जालना येथे मुलाखतीस हजर रहावे.

# नगरला प्रत्येक तालुक्यात दूध केंद्र सुरू करा - खा. निलेश लंके

नगर : दूध उत्पादनात महाराष्ट्रात नगर जिल्हा हा सर्वाधिक दूध उत्पादन करणारा जिल्हा आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यवसायाला चालना मिळावी यासाठी केंद्र सरकारने प्रायोगिक तत्त्वावर नगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात दूध प्रक्रिया केंद्र सुरू करावे, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

नीलेश लंके यांनी सांगितले, की नगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात दूध प्रक्रिया केंद्र सुरू झाल्यानंतर तालुकास्तरावर विविध उत्पादने तयार करून दुधाला स्थिर आणि सातत्यपूर्ण बाजारभाव मिळण्यास मदत होईल. शेतकऱ्यांना विश्वासार्ह उत्पन्न मिळू शकेल. हा प्रयोग शंभर टक्के यशस्वी होईल. नगर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावरील हा प्रयोग यशस्वी झाल्यावर देशभरात मागणीनुसार यंत्रणा उभी करता येईल. प्रक्रिया





यंत्रणा उपलब्ध असल्यास कच्च्या दुधाचे चीज, लोणी, तूप आणि दूध पावडर अशा विविध दुग्धजन्य उत्पादनांमध्ये रूपांतर केले जाऊ शकते. यामुळे दुधाचे सेल्फ लाइफ वाढेल आणि मूल्यवर्धन होऊन शेतकऱ्यांना आर्थिक लाभ देखील होऊ शकेल. केंद्रीय अर्थसंकल्पात दुग्ध व्यवसायास साह्य करण्यासाठी काही उपाय योजना करणे गरजेचे होते. पायाभूत सुविधांसाठी वाढीव निधी, अनुदान तसेच मदत मिळेल अशा योजनांचा समावेश करणे गरजेचे होते.

दुग्ध व्यवसाय, दुधाच्या किंमतीमधील चढ-उतार, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि जनावरांचे आजार अशा समस्यांना दूध उत्पादक सामोरा जात आहे. दुधाला मिळणाऱ्या दराचा विचार केला तर खर्च हाती पडत नाही. त्यासाठी दुधाला किमान आधारभूत किमतीच्या कक्षेत आणावे तसेच कृषी मूल्य आयोगासारख्या सुनिश्चित यंत्रणेच्या माध्यमातून योग्य दर निश्चित करणे आवश्यक आहे. पशुखाद्याचे दर वाढले त्या प्रमाणात दुधाचे दर वाढले नाहीत, असेही लंके म्हणाले.

# वीस लाख टन साखर निर्यातीस परवानगी द्या

कोल्हापूर : साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्याची मागणी आता केंद्रातील मंत्र्याकडूनच होत आहे. केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी सार्वजनिक वितरण विभागाचे मंत्री प्रल्हाद जोशी यांना पत्र लिहून यंदाच्या हंगामात सुमारे २० लाख टन साखरेच्या निर्यातीस परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे.

साखर उद्योगातील विविध संस्थांनी यंदा साखरेचे उत्पादन बऱ्यापैकी होईल, असा अंदाज व्यक्त केला आहे. या अंदाजाच्या आधारे केंद्राने साखर निर्यातीस परवानगी द्यावी, असे श्री. चौधरी यांनी म्हटले आहे. जर जादा साखर उत्पादित झाली तर साखरेच्या किमती कमी होऊ शकतात याचा फटका साखर कारखान्यांना होऊ शकतो. हे टाळण्यासाठी केंद्राने आतापासूनच साखर निर्यातीला परवानगी देण्याबाबत विचार करावा. 'इस्मा'ने यंदाच्या साखर हंगामाच्या प्रारंभी ९० लाख टन साखर शिल्लक असण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. देशांतर्गत गरज पूर्ण होऊन २०२४-२५ च्या अखेरीस सुमारे १३३ लाख टन साखर शिल्लक राहील. ती नेहमीच्या ५५ लाख टनाच्या राखीव कोट्यापेक्षा खूपच जास्त असेल. हा जादा होणारा साखर कोटा कारखान्यांचे व्यवस्थापन खर्च वाढवण्यास कारणीभूत ठरू शकतो, यामुळे कारखाने अडचणी येऊ शकतात. अतिरिक्त साखरेचा दबाव येणार: जर केंद्राने साखर उद्योगाबाबत चर्चा करून सद्यःस्थितीचा आढावा घेतल्यास सर्वप्रथम निर्यातीस परवानगी देणे ही बाब महत्त्वाची ठरते. कोणत्याही परिस्थितीत पुढील वर्षा अखेरीस होणारा अतिरिक्त साखरेचा दबाव टाळण्यासाठी यंदा वीस लाख टनाची साखर निर्यात करण्यास परवानगी द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.



# दूध उत्पादन वाढीसाठी दर्जेदार पशुआहार



जनावरांना दिला जाणारा आहार दुधाच्या गुणवत्तेवर परिणाम करत असतो. जनावरांच्या गरजेनुसार आहाराचे योग्य नियोजन केल्यास दुधाची प्रत सुधारण्यास मदत होते. जनावरांच्या आहारातील चारा आणि पशुखाद्यच्या प्रमाणावर दुधाची प्रत अवलंबून असते. चारा कुट्टीचा योग्य आकार महत्त्वाचा आहे. जो दुधाची प्रत ठरण्यास कारणीभूत असतो आहारामध्ये स्टार्सचे प्रमाण हा महत्त्वाचा घटक आहे त्यामुळे दुधाची प्रत ठरवता येते. आहारमधून मधून दिल्या जाणाऱ्या पदार्थावर दुधाची प्रत अवलंबून असते. पशु आहारातील स्निग्धांश आणि प्रथिने यांची मात्रा दुधाची प्रत वाढवण्यास मदत करते.

चारा आणि पशुखाद्य चे प्रमाण (४० : ६०) कमीत कमी असणे हे दुधाचा स्निग्धांश वाढवण्यास गरजेचे असते. हे प्रमाण ठेवल्यामुळे ओटीपोटातील आम्लता कमी होते प्रोपियनिक आम्लं निर्मिती वाढते जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करते.

धान्य युक्त आहार : योग्य पशुखाद्य घालताना चारा आणि पशुखाद्यचे प्रमाण आणि तंतुमय पदार्थ विरहीत कार्बोदकाचे प्रमाण महत्त्वाचं ठरतं. तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके यांचे प्रमाण एकूण शुष्क पदार्थाच्या आहारावर ३६ ते ३८ टक्के असावे. योग्य प्रमाणात तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश आणि प्रथिने वाढण्यास मदत होते. परंतु अति प्रमाणात खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश एक युनिट कमी होतो परंतु प्रथिने ०.२ ते ०.३ युनिटने वाढतात.

धान्य प्रक्रिया : धान्याचे प्रकार आणि त्यावर करावयाची प्रक्रिया याचा महत्त्वाचा परिणाम आहारामधील स्टार्च, पचनीयता, दूध वाढ तसेच दुधाची प्रत वाढवण्यास मदत होते दळलेले, रोल केलेले, गरम केलेले, स्टीम फ्लेवर्ड, वाफवलेले किंवा गोळी पेंड स्वरूपात धान्य खाऊ घातल्यास त्यामधून स्टार्सची पचनियता आणि प्रोपियनिक आमल निर्मिती वाढते. जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करतात.

स्टीम फ्लेक्स मका किंवा ज्वारी तुलनेनं वाफवलेला मका किंवा ज्वारी पेक्षा सातत्यपूर्ण दूध निर्मिती आणि दुधाचे प्रथिन वाढ होते परंतु दुधाच्या स्निग्धांश यांमध्ये बदल होत नाही. काही धान्य जसे की गहू मध्ये कार्बोदके असतात याचा आणि त्याच्यावरील अति प्रमाणातील प्रक्रिया विस्तृत प्रमाणात वापराचा परिणाम दुधाच्या स्निग्धांश आणि दूध निर्मिती कमी होण्यावर होतो. कार्बोदके आणि प्रथिनांचे माध्यम तसेच तंतुमय पदार्थ कर्बोदकांचे आहारातील प्रमाण यांचे निरीक्षण करावे जेणेकरून योग्य किणवन पद्धतीची खात्री होते. त्यामुळे दुधाची प्रत वाढण्यास मदत होते

दूध उत्पादन वाढवण्यासाठी : व्यवस्थित भाकड काळ ठरवावा वेताच्या पहिल्या आठवड्यात दुधाचा ताप (रक्तातील कॅल्शिअम कमी होणे) येणार नाही याची काळजी घ्यावी.

व्यायल्यानंतर गाईची निगा राखावी. ओटीपोटातील आरोग्य आणि आम्लता प्रतिबंधित करावी. चयापचयाचे आजार ओळखून त्यावर तातडीने उपाययोजना करावी. वेताच्या वेळी शरीर स्थिती गुण बीसीएस ३.० ते ३.२५ यादरम्यान ठेवावा.

# केळी बागेत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब ; शेतकऱ्याचे 'मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नाव!

पुणे : शेतीमध्ये रेकॉर्डब्रेक उत्पादन घेणारे शेतकरी आपल्याला सर्वांना माहित आहेत. एका शेतकऱ्याने केळी बागेत आधुनिक आणि प्रगत तंत्राचा वापर करून भरघोस उत्पन्न तर मिळवलेच शिवाय त्याने वापरलेल्या तंत्रज्ञानामुळे त्याचे नाव मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये सुद्धा नोंदवले गेले आहे.

धीरेंद्र देसाई हे गुजरातच्या भरूच जिल्ह्यातील पानेथा नावाच्या एका छोट्या गावात राहणारे एक यशस्वी शेतकरी आहेत, जे केळीच्या शेतीतून दरवर्षी लाखोंची कमाई करत आहेत. १९९१ मध्ये केळीची लागवड करून त्यांनी शेतीची सुरुवात केली. चांगल्या पिकासाठी ऊती संवर्धन, ठिबक सिंचन आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन यासारख्या प्रगत तंत्रांनी शेती करण्यात त्याचा हातखंडा आहे. म्हणूनच कृषी क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे धीरेंद्र सिंग यांचे नाव मॅजिक बुक ऑफ रेकॉर्डमध्येही नोंदवले गेले आहे. शेतकरी धीरेंद्र देसाई यांनी सांगितले की, त्यांची शाळा ७ किलोमीटर अंतरावर होती व कोणत्याही प्रकारची वाहतुकीची सोय तेव्हा नव्हती. शिक्षणासाठी त्याला खूप पायपीट करावी लागायची. त्यामुळे गावासाठी काहीतरी नवीन करायचे ठरवून ते कुटुंबासह शेतीला जोडले गेले. याशिवाय धीरेंद्र यांनी रेवा बागायत मंडळ शेतकरी उत्पादक संघटना स्थापन केली आणि स्वतः या शेतकरी उत्पादक



संघटनेत पर्यवेक्षक म्हणून रुजू झाले व कालांतराने मुख्य लेखापाल आणि व्यवस्थापकही झाले. केळीच्या फुलांचे विघटन करण्याचा प्रयोग देखील धीरेंद्र करतात. ही एक अशी पद्धत आहे जी बुरशीचे आणि कीटकांच्या हल्ल्याचा धोका कमी करते, ज्यामुळे उच्च दर्जाचे उत्पादन सुनिश्चित होते. यासाठी सर्वप्रथम, फुलकिडी आणि कीटक काढून टाकण्यासाठी इंजेक्शन देतात. नंतर वाळलेली फुले काढून टाकतात. ही क्रिया करणे आवश्यक आहे असे ते म्हणतात कारण जर असे केले नाही तर, वाळलेल्या फुलामुळे केळीवर डाग पडतात. यानंतर ते फवारणी आणि कापणी या तंत्राने केळीची गुणवत्ता सुधारतात.

जी ९ जातीच्या केळीची लागवड :

धीरेंद्र त्यांच्या यशाचे श्रेय प्रामुख्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब याला देतात. त्यांनी अकार्बनिक आणि सेंद्रिय पोषक घटकांचे संतुलित ७०:३० गुणोत्तर वापरून टिश्यू कल्चर, ठिबक सिंचन आणि एकात्मिक पोषक व्यवस्थापन यासारख्या प्रगत तंत्रांचा अवलंब केला. नवे तंत्रज्ञान आत्मसात करून त्यांनी जी ९ जातींच्या केळीची लागवड केली आहे. केळीच्या या सुधारित जातीमुळे केळीच्या इतर जातींपेक्षा जास्त उत्पादन मिळते. ही जात प्रति झाड २२५-२५० फळे देते. धीरेंद्र हा भारतातील एकमेव शेतकरी आहे ज्याने अवघ्या २६ महिन्यांत केळीची तीन पिके घेतली आहेत. त्यामुळे त्यांना हेक्टरी १६.७० लाख रुपयांपर्यंत निव्वळ उत्पन्न मिळाले.

केळी प्रक्रिया आणि रोजगार निर्मिती :

धीरेंद्र यांच्या केळीला मध्यपूर्व भागात वेगळी ओळख मिळाली आह. यामुळे त्यांनी आपल्या गावात केळी चिप्स निर्मिती युनिटची स्थापना केली, ज्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. पाणेठा सारख्या अतिरिक्त भागात पाण्याच्या उपलब्धतेमुळे केळी लागवड हा एक फायदेशीर व्यवसाय बनला आहे.




## महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्त्वाचा तह केला.
१७९९ : रणजितसिंग यांनी लाहोर ताब्यात घेतले व ते पंजाबचे सम्राट झाले.
१९२० : पनामा कालव्याचे औपचारिक उद्घाटन झाले. पण याआधीच ६ वर्षे तो वाहतुकीस खुला झाला होता.
१९३५ : आषाढ शुद्ध एकादशी आषाढी एकादशी 'प्रभात'चा 'चन्द्रसेना' हा मराठी चित्रपट मुंबईच्या 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. अनेक ट्रिकसीन्स असलेला हा चित्रपट याच नावाच्या मूकपटावर बेतलेला होता.
१९६० : राज्यातील भागलपूर आणि रांची विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
१९६१ : मुठा नदीच्या आंबी या उपनदीवरील पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे पुण्यात आलेल्या पुरात सुमारे २,००० लोक मृत्यूमुखी पडले तर १,००,००० लोक विस्थापित झाले.
१९६२ : लंडनमधील मार्क्वी क्लबमधे 'द रोलिंग स्टोन्स' चा पहिला कार्यक्रम झाला.
१९७९ : किरिबातीला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८२ : राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना
१९८५ : पी. एन. भगवती यांनी भारताचे १७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
१९९८ : १६ व्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत यजमान फ्रान्सने गतविजेत्या ब्राझिलचा ३-० असा पराभव करुन विश्वकरंडक जिंकला.
१९९९ : 'महाराष्ट्र भूषण' हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार सुनील गावसकर यांना प्रदान करण्यात आला.
२००१ : कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना 'टिळक पुरस्कार' जाहीर

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०० : १०० ई .पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८१७ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
**ख्रिस्त पूर्व १००:** ज्यूलियस सीझर रोमन सम्राट (मृत्यू: ख्रिस्त पूर्व ४२)
१८५२ : अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर अमेरिकन वनस्पतीतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९ : बिमल रॉय प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३ : इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२० : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७ : भारतीय क्रिकेट खेळाडू पूचिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५ : संजय मांजरेकर भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२ : अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७ : युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला यूसुफजई यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४८९ : दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६० : बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१६६५ : अलेक्झांडर कार्टराईट बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१० : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस्? यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९ : आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४ : हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वसंत साठे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म: )
१९९९ : राजेंद्रकुमार हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२००० : मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१ : देवांग मेहता तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२ : दारा सिंग मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३ : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)
२०१३ : बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ नोव्हेंबर १९२९)

# गेवराईत टिपरे व सोंग लोककला जतन करु- विजयसिंह पंडित

## शारदा प्रतिष्ठानकडून टिपरे महोत्सव

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगरीचे नाव टिपरे खेळ आणि सोंग या लोककलेच्या माध्यमातून संपुर्ण महाराष्ट्रात ओळखले जात आहे. गेवराईला लाभलेला हा पारंपारीक वारसा जतन करण्याचे काम टिपरे महोत्सवाच्या माध्यमातून केले जाईल. शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून यापुढील काळातही असे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातील असे प्रतिपादन महोत्सवाचे आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले. शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवात ते बोलत होते. यावेळी झालेल्या स्पर्धेमध्ये गेवराईच्या शिवनेरी टिपरे संघाने प्रथम, जगदंबा टिपरे संघाने द्वितीय तर झुंजार टिपरे संघाने तृतीय पारितोषिक पटकावले.

बीड जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी स्पर्धा आयोजक विजयसिंह पंडित, गेवराई पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक लंके, शिवाजी कोटकर, पोलिस उपनिरीक्षक शिवाजी भुतेकर, सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे, शारदा स्पोर्टस्? अॅकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या शितल धोंडरे, परिक्षक अॅड. सुभाष निकम, प्रशांत रुईकर, प्रा. राजेंद्र



बरकसे, विष्णूप्रसाद खेत्रे, विलास सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते आणि संयोजनक समितीचे सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्रात प्रसिध्द असलेला गेवराई येथील पारंपारीक टिपरे आणि सोंग हा सांस्कृतिक वारसा सक्षमपणे चालविण्यासाठी व ही परंपरा जतन करून टिपरे व सोंग या कलेला प्रोत्साहन मिळावे यासाठी बीड जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शनिवार, दि.१० ऑगस्ट रोजी गेवराई येथे टिपरे आणि सोंग स्पर्धेचे भव्यदिव्य आयोजन केले होते. महोत्सवात टिपरे स्पर्धा सांघीकमध्ये शिवनेरी ग्रुपने प्रथम पारितोषिक रोख ३३,३३३/- रु., स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र तर जगदंबा ग्रुपने द्वितीय रोख २२,२२२/- रु., स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र तसेच झुंजार ग्रुपने तृतीय रोख ११,१११/- रु., स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र पारितोषिके पटकावले. अण्णाभाऊ साठे क्रीडा मंडळ आणि धर्मवीर संभाजी क्रीडा मंडळ यांनी उत्तेजनार्थ प्रत्येकी रोख ५,५५५/- रु., स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र पटकावले. उत्कृष्ट पात्र सजावट स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक रोख ५,०००/ - रु., स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र, झुंजार ग्रुपच्या शाहू महाराज या पात्राला देण्यात आले, द्वितीय पारितोषिक रोख ३,०००/- रु, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र मुळे मावशी या पात्राला देण्यात आले तर तृतीय पारितोषिक रोख २,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र सावता क्रीडा मंडळाच्या महात्मा फुले या पात्राला देण्यात आले. उत्तेजनार्थ प्रत्येकी रोख १,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र ओम ग्रुपच्या उर्फी जावेद या पात्राला देण्यात आले. उत्कृष्ट सोंग स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक रोख ५,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र ओम ग्रुपच्या आदिवासी पात्राला देण्यात आले. द्वितीय पारितोषिक रोख ३,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र विकास ठाकुर यांच्या कैदी सोंगाला देण्यात आले तर तृतीय पारितोषिक रोख २,०००/ - रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र सावता संघाच्या जोकर या पात्राला देण्यात आले. उत्तेजनार्थ रोख १,५००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र प्रत्येकी श्रावणबाळ आणि विठ्ठल या पात्राला देण्यात आले. उत्कृष्ट वाद्य वादक स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक रोख ३,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र ओम ग्रुपच्या वादकाला देण्यात आले, द्वितीय रोख २,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र संतोष पवार या वादकाला तर तृतीय पारितोषिक रोख १,५००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र साठे ग्रुपच्या वादकाला देण्यात आले, उत्तेजनार्थ रोख १,०००/- रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र प्रत्येकी क्रांती ग्रुपच्या संबळ वादकाला तर निकम गल्लीच्या वादकाला देण्यात आले.

# श्रद्धासंपन्न व्यक्ती,सर्वात श्रीमंत व्यक्ती -भदंत धम्मशिल थेरो

## माजलगाव येथे साप्ताहिक धम्मदेसना



माजलगाव । प्रतिनिधी

आपल्या अंतर्मनात त्रिरत्ना प्रती दृढनिष्ठेने प्रविष्ट होण्यासाठी श्रद्धा हा सद्गुण अंगी बाणवणे गरजेचे आहे. खऱ्या श्रद्धेमुळे माणूस माणसाशी जोडला जातो. धम्मामध्ये खरीखुरी विकसित झालेली श्रद्धा ही माणसाला ताकद ,बल आणि ऊर्जा देते. पण श्रद्धा ही अंतर्मनातील आहे की वरवरची आहे हे देखील समजून घेणे गरजेचे आहे.खऱ्याखुऱ्या श्रद्धेच्या नौकेतून भवसागर पार करता येतो व सुखाचे तीरावर पोहोचता येते अशी श्रद्धा ही खरे माणसाचे वैभव आहे. श्रद्धेच्या इंद्रियाने धम्म समजून घेतला तर, श्रद्धेमुळे माणसाची लूट होत नाही, म्हणून श्रद्धासंपन्न व्यक्ती हा सर्वात श्रीमंत व्यक्ती असतो. या करिता धम्माचे अंतकरणपूर्वक चिंतन करत आपल्यातील श्रद्धाबीज ओळखणे आणि ते फुळवणे हे धम्म जीवनातील पहिले पाऊल आहे.असे प्रतीपादन पूजनीय भदंत धम्मशील थेरो यांनी केसापुरी कॅम्प येथील श्रावस्ती बुद्ध विहार येथे रविवारी तारीख ११ ऑगस्ट २०२४ रोजी साप्ताहिक बुद्ध वंदना निमित्ताने धममदेस्नेत केले.

तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कॅम्प येथे दर रविवारी धम्मदेसना आयोजित करण्यात येते. या वेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांनी '' उपासकाचे चार सदगुण '' या विषयावर बोलत होते उपासकाचे चार सदगुण पैकी आज श्रद्धा सद्गगुण विषयी सुमारे दीड तास सुंदर परिणामकारक असे त्यांचे प्रवचन झाले. यावेळी साप्ताहिक पूजेचे यजमान तसेच अल्पोपहार सौजन्य संगीताताई दामोधर बागडे यांचे होते. प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन अॅड. दशरथ मकसरे यांनी केले.तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी सद्? धम्म सेवा संघाचे पांडुरंग जाधव, एम.बी चांदमारे, सोपान उजगरे, एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, अरुण नाकलगावकर,वालाबाई टाकनखार, तसेच डॉ.श्रीराम खळगे, सुनील सौंदरमल,एल.आर.मस्के, दीपक भालेराव, भीमराव ढाकरगे ,लक्ष्मणराव सहजराव, बी जी रणदिवे,नवनाथ गायकवाड, जे सी चांदमारे, सूनिता घनघाव, मनीषा एकनाथ मस्के, रूच्के सर सुधामती पौळ, आशा शिरसट,शीतल सातपुते, धनश्री सातपुते, राधाबाई फुलवरे,पूनम धाईजे,नालंदा भालेराव, यांच्यासह तालुक्यांतील अनेक बौद्ध उपासक उपसिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'केविसंस' करणार रस्तारोको आंदोलन!

## मांजरा नदी पूल रस्ता दुरुस्तीसाठी निवेदन




केज । प्रतिनिधी

अक्षरश मृत्यूचा सापळा बनलेल्या मांजरा नदीपुलाच्या दोन्ही बाजूनी एक किमी रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणासाठी आता आरपार चे आंदोलन करण्याचा निर्णय केज विकास संघर्ष समितीने घेतला असून या मागणीसाठी आता येत्या बुधवार दि १४ ऑगस्ट रोजी या भागातील सर्व वाहनचालक व जनतेच्या सहभागाने भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे समितीचे समन्वयक हनुमंत भोसले यांनी सांगितले आहे.खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज तालुका अंतर्गत मांजरा नदी पुलाजवळ नवीन पुलाचे काम सुरू असुन सध्याची वाहतूक जुन्या पुलावरून सुरू आहे.

मात्र या पुलाच्या दोन्ही बाजूनी मिळून अंदाजे एक किमीचा रस्ता अक्षरशः प्रवाशांच्या मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावर दोन ते तीन फूट खोलीचे खड्डे मोठ्या प्रमाणात पडले असून रस्त्यावर दगड-गोटे व मातीचे प्रमाण ही खूप मोठे आहे. या रस्त्यावर आजपर्यंत शेकडो अपघात झाले असून काहींना जीव गमवावा लागला आहे तर अनेकांना अपंगत्व आले आहे. रात्रीच्या वेळी या रस्तावर चोऱ्या व लूटीचे प्रमाण खूप वाढल्याने अत्यंत धोकेदायक बनला आहे. विशेष म्हणजे या बाबीची संबंधित यंत्रणा व प्रशासनाला चांगलीच ठाऊक आहे. केज विकास समिती गेली चार वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणासाठी उपोषणे, धरणे, घंटानाद व रस्ता रोकोसारख्या आंदोलनाच्या माध्यमातून पाठपुरावा करत आहे. मात्र तरीही या गंभीर प्रश्नासवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ दुर्लक्ष का करत आहे हा मोठा प्रश्न आहे. विशेष म्हणजे समितीने वेळोवेळी केलेला पाठपुरावा व आंदोलनामुळे कांही हालचाल झाली की केज तालुक्याचे लोकप्रतिनिधी या कामाच्या श्रेयासाठी घोड्यावर बसतात व न झालेल्या कामाच्या आपल्या नांवे प्रसिद्धी माध्यमातून जाहिराती करतात. राज्यभर रस्त्याचे जाळे विणणारा महाराष्ट राज्य रस्ते विकास महामंडळ विभाग लोकांचे जीव जाताना एवढा निष्क्रिय व मूग गिळून गप्प का आहे हाही मोठा प्रश्न आहे. या पूर्वी ''एमएसआरडिसी ने रस्ता लवकर दुरुस्ती व डांबरीकरण करून देण्याचे तोंडी व लेखी आश्वासने दिली आहेत मात्र काम केले नाही. आता यावेळी या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती येत्या बुधवार दि १४ ऑगस्ट रोजी या रस्त्यावरून प्रवास करणारे वाहनचालक व या भागातील नागरिकांच्या सहभागाने मांजरा नदी पुलावर बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात या परिसरातील गावकऱ्यांनी, वाहनचालकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही समिती च्या वतीने करण्यात आले आहे. निवेदनावर हनुमंत भोसले यांच्यासह नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# क्षीरसागर यांच्या हस्ते विविध विकास कामांचा शुभारंभ

## पिंपळनेर सर्कल मध्ये झंझावाती दौऱ्यास उत्तम प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी काल पिंपळनेर सर्कलचा दौरा पूर्ण केला या दौर्या दरम्यान ईट या ठिकाणी विविध विकास कामाचा शुभारंभ करून या ठिकाणच्या हनुमान मंदिराच्या सभागृहाचे लोकार्पणही केले. या दौर्यात ग्रामीण भागातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शनिवार दि.१० ऑगस्ट रोजी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पिंपळनेर सर्कल मधील ईट गंगनाथवाडी, पिंपळगाव मंझरा, म्हाळसपुर, म्हाळस जवळा, नागापूर, उमरी, नागापूर (बु.), अंथरवणपिंप्री, वासनवाडी, भागात संपर्क दौरा केला होता. या दौर्या दरम्यान विविध ठिकाणी विकास कामांचा शुभारंभ करत हनुमान मंदिराच्या सभागृहाचे लोकार्पणही त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जगदीश काळे, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, अरुण बोंगाणे, विलास विधाते, सनी वाघमारे, शुभम धनवे, चंद्रकांत पेंढारे, सखाराम मस्के, नानासाहेब काकडे, देवीलाल चरखा, बबन डोईफोडे, नागसेन मस्के, सरपंच गोरख डोईफोडे, कल्याण खांडे, किशोर ढोकने, दत्तात्रय थोटे, विशाल दोडके आदिसह प्रमुख कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, आपल्या कार्यकाळात या भागात सौर ऊर्जा, रस्ते , नाल्या आणि सभा मंडपाची कामे मोठ्या प्रमाणात आपण केली असून या ठिकाणी १२० ग्रामस्थांना घरकुलाचा लाभ मिळवून दिला तसेच वाचनालय, अभ्यासिका,कंपाऊंड वॉल आणि इयत्ता नववी ते बारावी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सुविधा कशी उपलब्ध होईल यासाठी आपण निश्चित प्रयत्न करू नीटच्या मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत आपण आगामी काळात नक्कीच ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करून माध्यमिक शाळेची मंजुरी करून घेऊ याच गावात दहा लक्ष रुपयाचा मुख्य रस्ता पूर्ण केला असून बौद्ध विहार मध्ये पेवर ब्लॉकचे काम करून घेत आहोत. ईटच्या ग्रामस्थांनी मला भरभरून प्रेम दिलेले आहे माझ्या पाठीशी कायम राहणारी ही मायबाप जनता आहे. सर्वच समाज घटकातील लोक बरोबर आहेत फक्त जागृत रहा आणि साथ द्या गावात एकूण ६० लाख रुपये उपलब्ध करून विविध विकास कामे केली आहेत. पाणी, वीज, सडक या तीन गरजा आधी पूर्ण होणे गरजेचे असून अन्य विकास कामे करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. आगामी काळात निवडणूका आहेत, दिशाभूल करणार्या पोस्ट येतील पण आपलं काम हेच आपली ओळख आहे. सर्व जाती धर्मांना बरोबर घेऊन आपण ही साखळी पुढे न्यायची आहे त्यामुळे पुढच्या प्रवासात सर्वांनी बरोबर रहावे बिनकामाच्या माणसाला निवडल्यानंतर काय होऊ शकते याची प्रचिती सर्वांना आलीच आहे असे सांगून त्यांनी आगामी निवडणुकीत मतदारांनी पाठीशी राहावे असे आवाहन केले.

# धूनकवड येथे धुनकेश्वर महोत्सव

## कीर्तन,महाप्रसादाचा लाभ घ्यावा- अनिल महाराज तुपे

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड गावचे ग्रामदैवत धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त दुसरा सोमवार दि.१२ऑगस्ट रोजी सकाळी १०ते १ वाजताची किर्तनसेवा ह.भ.प.अनिल महाराज तुपे नाशिककर यांचे सुश्राव्य वाणीतुन किर्तन होणार आहे तरी या पंचक्रोशीतील भाविक- भक्तांनी या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

धुनकवाड येथील धुनकेश्वर देवस्थानात गेल्या आठ वर्षांपासून भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या श्रावण महोत्सवाचे प्रति वर्षाप्रमाणे या ही वर्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन चार ही सोमवारी नामवंत किर्तनकारांचे किर्तन होणार असुन पहिल्या श्रावण सोमवारी भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके यांचे किर्तन झाले आहे.दुसरा श्रावण सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी ह.भ.प.अनिल महाराज तुपे नाशिककर यांचे कीर्तन होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या हरिकिर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान केशव इंद्रसेन मुंडे,शिवाजी काशिनाथ यादव,अच्युत त्रिंबक कागणे,शिवाजी रामा गावडे,जगदीश बंकटी गोरे,गोवर्धन अरुण यादव,सुंदर साहेबराव भोसले,राम दशरथ यादव,बालासाहेब रामा काळे,बापू महादेव रोटे,विजय अंबादास खैरमोडे,दत्ता विष्णू यादव,नितीन बाबू जावळे,महादेव सटवा कागणे,अनिल संभू काजळे,दिनकर सदाशिव मुंडे,नवनाथ प्रभाकर गावडे,कचरू रावसाहेब गावडे,राजेभाऊ अंबादास खैरमोडे,अशोक बाबासाहेब भोसले,बालासाहेब यशवंत देशमाने यांच्यासह धुनकेश्वर श्रावण महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिंद्रुड प्रा.आ. केंद्रात संत निरंकारी मंडळाच्या वतीने वृक्षारोपण

दिंद्रुड । प्रतिनिधी

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन दिंद्रूड शाखेच्या वतीने वन नेस वन प्रोजेक्ट अंतर्गत येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आवारात साफसफाई करत वृक्षारोपणाचा कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला होता. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुकर घुबडे, सरपंच अजय कोमटवार, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडुजी खांडेकर, हभप उध्दव महाराज ठोंबरे, दगडूअप्पा भुजबळ, विलासकाका पारेकर, वैजनाथ काशीद, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती या प्रसंगी होती.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन दिल्ली च्या वतीने 'वन नेस वन' अभियाना अंतर्गत देशभरात स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडत आहे. याच अनुषंगाने दिंद्रुड येथील शंकर



यादव, अमर जाधव, बबीता चांदबोधले यांच्यासह संत निरंकारी महामंडळाच्या भक्त परिवाराने दिंद्रुड येथे हा उपक्रम राबवला. नव्यानेच उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारातील गवत व अस्वच्छता याची साफसफाई करून परिसर स्वच्छ व सुंदर बनवला. या परिसरात अशोका, करंजी, जांभळ, आंबा, गुलमोहर,नांदुरकी, कदंब यासह विविध प्रकारची ६१ रोपटे रविवारी लावून वृक्षारोपण केले. पुढील तीन वर्ष या रोपट्यांची देखभाल निरंकारी मंडळ करणार आहे. लावलेल्या वृक्षांच्या रोपट्यांना पाणी देण्यासाठी येथील उद्योजक संजय शिंदे यांनी ठिबक सिंचनची व्यवस्था करून दिली. समाजकारणासोबतच माणसातील माणुसकी जपणाऱ्या या उपक्रमामुळे उपस्थित मान्यवरांनी संत निरंकारी मंडळाचे कौतुक केले.

# वाघिरा येथे रंगला कुस्त्यांचा फड; नामवंत मल्लांनी लावली हजेरी

बीड । प्रतिनिधी

मौजे वाघीरा येथे सालाबादाप्रमाणे वै.श्री संत गुरुवर्य सिताराम बाबा यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन वाघिरा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. सप्ताहाची सांगता व महाप्रसाद झाल्यानंतर बजरंग क्रीडा मंडळ व व्यायामशाळा वाघिर यांनी २८ वर्षाची परंपरा जपत वाघीरा महोत्सव अंतर्गत जंगी कुस्त्यांचे सामने आयोजित केले होते.या सामन्यासाठी बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पैलवान मंडळी उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे आखाडा पूजन उद्घाटक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ बांगर यांनी केले, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद पाटोदा चे युवा नेते आबलुक घुगे, नरसिंग जाधव, बीड जिल्हा रबी असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख, वाघीरा गावचे सरपंच श्रीकृष्ण बांगर, उपसरपंच दत्तात्रय बांगर, मुरकुटे, डोळसे, जाधव हे उपस्थित होते.

आखाडा पूजनानंतर क्रीडा मंडळाचे दिवंगत खेळाडू वै.विनोद सानप यांना दोन मिनिटं स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत व मनोगत पार



पडले. यावेळी संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ बांगर यांनी पंचक्रोशीतील युवकांनी व्यसनाधीनतेकडून व्यायामाकडे वळावे व शरीर मन सुदृढ करून देश सेवेसाठी योगदान द्यावे असे आवाहन केले. त्यानंतर प्रत्यक्ष कुस्त्यांना सुरुवात झाली. गावातील अतिशय छोट्या खेळाडूंपासून महाराष्ट्र चॅम्पियन पर्यंत आलेल्या सर्व खेळाडूंच्या कुस्त्या जोडून त्यांना क्रीडा मंडळाच्या वतीने रोख स्वरूपात बक्षीस वितरित करण्यात आले. जिंकणाऱ्या खेळाडूस ७० टक्के रक्कम व पराभूत खेळाडूस ३० टक्के रक्कम हे कुस्तीचे आश्रयदाते राजर्षी श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या तत्वानुसार दोन्ही पैलवानांना न्याय देण्याचे काम क्रीडा मंडळाच्या वतीने यावेळी करण्यात आले. या कुस्त्यासाठी वाघिरा गावातील व पंचक्रोशीतील तरुण मंडळी, वयस्कर मंडळी आणि महिला मंडळी ही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या मैदानामध्ये महिलांच्या चटकदार कुस्त्या पार पडल्या. गावातील अनेक दानशूर मंडळींनी मुक्तहस्ते बक्षिसांची उधळण पैलवानांवर केली. १०रुपये पासून ५००१ रुपये पर्यंतच्या कुस्त्या यावेळी पार पडल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पैलवान प्रा. महेश घुले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून क्रीडा मंडळाचे बिभीषण बांगर, वैजिनाथ बांगर, सुंदर बांगर, विलास वाघमारे, डॉ सुरज बांगर,अजिनाथ बांगर, अजिंक्य बांगर डॉ पवन बांगर, रवींद्र बांगर, जयराम बांगर,भाऊसाहेब बांगर,अमर बांगर यांनी काम पाहिले. मंडप व साऊंड सिस्टीम व्यवस्था मल्हारी आरगुडे यांनी पर पडली. क्रिडा मंडळाचे राष्ट्रीय खेळाडू वैजनाथ बांगर यांची वणपाल पदावर पदोन्नती, विलास वाघमारे राष्ट्रीय स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त केले, अजिंक्य बांगर राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. या मैदानातील क्रमांक एक मानाची कुस्ती महाराष्ट्र चॅम्पियन पै.दत्ता मेटे विरुद्ध गणेश मकाळ यांच्यात झाली, यामध्ये दत्ता मेटे यांनी चीतपतीने प्रक्षणीय विजय मिळवला. या कुस्त्या अतिशय उत्साहात पार पडल्या.

# पठाण अमर जान यांचा मनसेत प्रवेश

बीड । प्रतिनिधी

येथील तरुण पत्रकार तथा समाजसेवक पठाण अमर जान यांनी शहरातील अन्विता हॉटेल या ठिकाणी मनसे प्रमुख श्री राज ठाकरे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला आहे. बीड येथील तरुण पत्रकार तथा समाजसेवक पठाण अमर जान यांनी काल हॉटेल अन्विता येथे मनसे मध्ये प्रवेश केला आहे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पठाण अमर जान यांना मनसेचा स्कार्फ घालून मनसे मध्ये प्रवेश दिला आहे मनसेचे पक्षनिरीक्षक आणि नाशिक महापालिकेतील मनसे नगरसेवक सलीम मामा शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मनसेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे यांच्या शिफारशीने अमर जान पठाण यांचा मनसेत प्रवेश झाला आहे.

प्रस्थापित मुस्लिम नेते मुस्लिम समाजातील तरुणांना वेगळ्या मार्गाने घेऊन जात राजकारणापोटी मुस्लिम तरुणांचा मोठ्या प्रमाणात वापर होत



असल्याने व समाजाच्या शिक्षण,रोजगार व विकासाच्या मुद्द्यावर प्रस्थापित नेते आपले भूमिका मांडत नसल्याने आपण या गोष्टीला विरोध केल्याने मुस्लिम समाजाच्या तथाकथित प्रस्थापित नेत्यांना माझ्यासारख्या सुशिक्षित कार्यकर्त्याची अडचण होत असल्याने आपण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश करत असल्याचे पठाण अमर जान यांनी म्हटले आहे पठाण यांच्या प्रवेशाच्या वेळी मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे पक्षनिरीक्षक नरेंद्र तांबोळी मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस वाहतूक सेनेचे राज्य उपाध्यक्ष रवींद्र नेमाणे यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# बीडमध्ये राज्यातील ४ थे डिजिटल ग्रंथालय इमारतीच्या जागेचे पालकमंत्री मुंडे यांच्या हस्ते होणार भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये महाराष्ट्र शासन उच्च तंत्र व शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई अंतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय , बीड यांच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता सर्व्हे. नं. ३४ , सहयोगनगर , शासकीय गोदाम , जालना रोड , बीड येथे राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते होणार असून हे ग्रंथालय राज्यातील ४ थे डिजिटल ग्रंथालय म्हणून साकारणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की , बीडमध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय , बीड याची स्थापना २००५ साली नगर रोड, बीड येथे एका भाडाच्या जागेत झाली. वर्षानुवर्षे या ग्रंथालयामध्ये हजारो संख्येने शालेय विद्यार्थी , एमपीएससी यूपीएससी स्पर्धा परीक्षाचे तयारी करणारे विद्यार्थी तसेच



वकील ,शासकीय अधिकारी, कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक सभासद असून ग्रंथालयातील सुविधेंचा उपयोग करीत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता सकाळी ८ ते संध्याकाळी ८ वाजेपर्यंत हे ग्रंथालय सुरू राहते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना उत्तम दर्जेचे वाचनीय साहित्य व सुविधा उपलब्ध करून देते.

एमपीएससी , यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षा तयारी करणारे विद्यार्थी त्याचबरोबर व्यवसायिक अभ्यासक्रमांचे विद्यार्थी यांना अति उत्तम दर्जाचे डिजिटल सुविधा प्राप्त व्हावे यासाठी या जिल्हा ग्रंथपाल अधिकारी,संजय मस्के यांनी जिल्हा प्रशासनाकडे कार्यालयाच्या नवीन स्वातंत्र्य इमारतीसाठी प्रस्ताव दिला होते. संजय मस्के यांनी राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे व मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती ,मा अविनाश पाठक साहेब ,यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन स्वातंत्र्य इमारतीसाठी ५ कोटींचा निधी मंजूर करून घेतला.

जिल्हा प्रशासनाने या ग्रंथालयाच्या स्वातंत्र्य इमारतीसाठी २० हजार चौ. फूट जागेची संमती दिली असून एवढ्या प्रचंड जागेत १६ हजार चौ. फूट अशी भव्य दोन मजली इमारतीचे बांधकाम होणार आहे.

जिथे गेलो तिथे नवीन स्वातंत्र्य ग्रंथालय इमारती उभारल्या -जिल्हा ग्रंथालय अधिकारी,संजय मस्के

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड येथील सध्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी या पदावर संजय मस्के हे कार्यरत आहे. संजय मस्के हे धुळे , जालना , घनसांगवी , नंदुरबार , हिंगोली , लातूर येथे जिल्हा ग्रंथालय अधिकारी या पदावर कार्यरत असताना तिथे ग्रंथालयाच्या स्वातंत्र्य जागा व इमारती बांधण्यासाठी संबंधित जिल्हा प्रशासनाकडुन निधी मिळवून देण्यात सर्वात जास्त मोलाचा वाटा संजय मस्के यांचा आहे. भूमिपूजन कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून यांची उपस्थिती राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे उद्घाटक म्हणून लाभले आहे. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून खा.रजनी पाटील ,आ.पंकजा मुंडे ,खा.बजरंग सोनवणे ,आ. संदीप क्षीरसागर ,आ.प्रकाश सोळंके ,आ.लक्ष्मण पवार , आ.सतीश चव्हाण ,आ.विक्रम काळे , आ.बाळासाहेब आजबे ,आ.नमिता मुंदडा ,मा. अविनाश पाठक,भा.प्र.से. ,अविनाश बारगळ , भा.पो.से.संगीतादेवी पाटील भा.प्र.से.,मा.अशोक गाडेकर , मा.गजानन कोटेवार , डॉ रामेश्वर पवार ,मा.सुनील हुसे , मा.राम मेकले ,मा सुधीर चाटे व ईतर या सर्वांची उपस्थिती लाभनार आहे .

ना.धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून साकारनार डिजिटल ग्रंथालय भव्य ईमारत

प्रशासकीय सेवेत बीड जिल्ह्यातील टक्केवारी वाढावी म्हणून शासकीय ग्रंथालय ची उभारणी.ना धनंजय मुंडे डिजिटल ग्रंथालय काळाची गरज.ना.धनंजय मुंडे

## ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना मोफत डिजिटल सुविधा व इतर सुविधा

विद्यार्थ्यांसाठी २५ संगणक , मोफत वायफाय , गॅजेट्स , २८ प्रकारची वर्तमानपत्रे , १५० हून जास्त मासिक नियतकालिके , ४५ हजारांहून जास्तीचे पुस्तके, ग्रंथ तसेच कादंबऱ्या उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ग्रंथालयाचे सभासदांसाठी सुद्धा वर्तमानपत्रे ,मासिक नियतकालिके, ग्रंथ, कादंबऱ्या ,रिसर्च पेपर ,कोर्ट निकाल ,रिसर्च जागतिक माहिती अशा प्रकारे अजून बरेच काही सुविधा उपलब्ध केलेले आहेत. या सर्व गोष्टींचा फायदा घेण्यासाठी नागरिकांना ग्रंथालयाचे सभासद व्हावे लागेल. हे सभासद पद दोन वर्षासाठी फक्त ६०० रुपयांत होते. तसेच मुले व मुलींच्या सोयीसाठी वेगवेगळे विभाग उपलब्ध आहे, जसे --वर्तमानपत्र विभाग , डिजिटल विभाग , जेष्ठ नागरिक विभाग ,जनरल वाचन कक्ष विभाग , गटचर्चा विभाग , एमपीएससी विभाग , यूपीएससी विभाग या सर्व विभागांचे मुले व मुलींची वेगवेगळे स्वातंत्र्य विभाग आहे. वरील सर्व बाबी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत सुविधा देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नोकरी लागावी व दलित समाजाचा विकास व्हावा हाच ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश आहे.

# माजलगाव मतदारसंघाची जागा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला सोडावी - सय्यद याकुब

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील व्यंकटेश हॉटेल येथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या अयोजीत संवाद बैठकीत पक्षाचे जिल्हा कमेटी सदस्य कॉ.सय्यद याकुब यांनी माजलगाव मतदार संघ महाविकास अघाडीने माकपा पक्षाला सोडावी असे प्रतिपादन केले.

पुढे बोलताना ॲाड सय्यद याकुब यांनी सांगीतले की माजलगाव विधानसभे अंतर्गत येणाऱ्या माजलगाव, वडवणी व धारुर या तालुक्यामध्ये पक्षाचे अनेक वर्षांपासून खुप जुने काम असून शेकडो कार्यकर्तयांची फौज सक्रीय कार्यरत आहेत.सतत कामगार,शेतकरी,





विद्यार्थी,युवक मजूरांच्या प्रश्नावर लढा देत आहेत.या मतदार संघात पक्षाचे खुप मोठे संघटन असुन,पक्षाला मानणारा व पक्षावर प्रेम्? करणारा खुप मोठा वर्गआहे या मतदार संघात पुर्वापार पासून खुप मोठा मतदार वर्ग देखील असल्यामुळे या जागेवर माकपा पक्षाने दावा केला असून याबाबत पक्षाच्या राज्य नेत्रत्वाने शरद पवार,नाना पटोले व उद्धव ठाकरे यांची भेट घेवून मागणी देखील केलेली आहे. या संवाद बैठकीचे अध्यक्ष अशोक कदम हे होते. या बैठकीत तालुक्यातून आलेल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करुन या जागेची जोरदार मागणी केली.या बैठकीला बोरगावचे सरपंच अशोक सोळंके, मजहर देशमूख, महेबुब भाई, शेषेराव अबुज, चंद्रकांत गाते, मुस्तकीम बाबा, रामचंद्र चिंचाणे, क्रष्णा सोळंके अशोक भुंबे, मधुकर अडागळे,कट्ठू भाई,खदीर भाई, ॲाड कुंभार,लहू खर्गे,सुहास झोडगे, अशोक पोपळे, विनायक पौळ, बालू तौर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# इंजि. एन. डी. शिंदे यांच्या केज मतदारसंघातील विविध गावांना भेटी; पदाधिकाऱ्यांसह नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघातुन निवडणूक लढवू इच्छिणारे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे हे मतदारसंघातील गावोगावी जाऊन तेथील मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या केज मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे यांनी केज मतदारसंघात असलेल्या अंबाजोगाई व केज तालुक्यातील विविध गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तथा तेथील प्रतिष्ठित नागरिक त्यासोबतच तेथील ग्रामस्थांच्या समोरासमोर प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. तिथे ते स्वतःची ओळख करून देत आपल्या संभाव्य उमेदवारीचे पत्रक



त्या त्या ठिकाणच्या ग्रामस्थांना देत होते. प्रत्यक्ष भेटलेल्या गावामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील कुरणवाडी, येल्डा , चीचखंडी, राक्षसवाडी, ममदापुर, पठाण मांडवा या गावात जाऊन तेथील मतदारांच्या अडचणी व भावना जाणून घेतल्या.

याअगोदर देखील शिंदे यांनी जवळपास तीस ते चाळीस गावना भेट देऊन तेथील नागरिकांची मते जाणून घेतली. प्रत्यक्ष भेट दिलेल्या गावांमध्ये प्रामुख्याने सनगाव, उमराई, मुळेगाव ,लाडे वडगाव , होळ, कळम्ब अंबा या व यासह विविध गावांना व तेथील ग्रामस्थांना समोरासमोर भेटी दिल्या. यावेळी ग्रामस्थांनी देखील इंजि एन डी शिंदे यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. मी इंजि एन डी शिंदे आपल्या गावाबरोबरच संपूर्ण मतदारसंघाचा विकास करण्यासाठी तथा येथील मूलभूत प्रश्नांची उकल करण्यासाठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवण्याची इच्छा शिंदे यांनी व्यक्त केली. यावेळी ग्रामस्थांनी देखील इंजि एन डी शिंदे यांचे म्हणणे ऐकून घेतले .

या भेटीदरम्यान शिंदे यांनी ग्रामस्थांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्या त्या गावातील युवक, महिला तसेच त्या परिसरातील प्रतिष्ठित व जेष्ठ नागरिक यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. तेथील नागरिकांकडुन देखील इंजि एन डी शिंदे यांना सहकार्य करण्याचे आश्वासन मिळाले.यावेळी अंबाजोगाई , केज तालुका व नेकनूर सर्कल मधील मतदारांच्या विकासासोबत त्या भागातील आरोग्य, शिक्षण, स्वच्छता , बेरोजगारी, पाणी या व अशा विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी आपण जीवाचे रान करणार असल्याचे इंजि एन डी शिंदे यांनी मतदारांना सांगितले.

# स्तनपान सप्ताहाचे निमित्ताने इनव्हीलर क्लबच्या वतीने जन्मला मातांना पौष्टिक आहाराचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्तनपान सप्ताहाचे निमित्ताने इनव्हीलर क्लब च्या वतीने येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात जन्मदा मातांना पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले.

येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागातील प्रसुती व स्त्री रोग निवारण अंतर रुग्ण कक्ष क्रमांक ८ व ९ मध्ये प्रसुती विभाग प्रमुख डॉ. गणेश तोंडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या स्तनपान सप्ताहात स्तनदा मातांना पोस्टिक ड्राय फ्रूट किसमिस मनुके यांचे वाटप




उपस्थित सर्वांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी जवळपास ४९ मातांना मनुके पॅकचे वाटप केले.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेले डॉ. गणेश तोंडगे , डॉ.अनुष्का , डॉ .अमेरा , तिथल्या प्रमुख इन्चार्ज परिचारीका शारदा गीत्ते सिस्टर मिरा, इतर सर्व मान्यवर व क्लबच्या देशमुख मॅडम , संगीता नावंदर , जयश्री कराड , अंजली चरखा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अंजली चरखा यांनी मानले. उपस्थित असलेल्या डॉक्टर, परिचारीका व क्लबच्या सर्व सदस्यांचे मनापासून आभार संयोजकांनी मानले.

# मुख्यमंत्री मामावर भाचे, भाची नाराज; सोशल मीडियावर पत्र व्हायरल

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर झाली आणि योजनेचे फॉर्म ऑनलाईन भरण्यासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या महा आयटी विभागाचे सर्वर जाम झाले असे बोलले जात आहे पण यात विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे विविध प्रमाणपत्र वेबसाईटवर अडकली त्याामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे यालाच कंटाळून धारूर शहरातील विनोद शिनगारे यांनी थेट मुख्यमंत्र्याांना पत्र लिहून सोशल मीडियावर व्हायरल केले आहे.

मुख्यमंत्री मामा आपण आपल्या लाडक्या बहिणीला पंधराशे रुपये प्रति महिना ओवाळणी देण्याच्या नादात आपल्या लाडक्या आहोत की नाहीत माहित नाही पण भाचे भाची ना नाराज करत आहात त्याांच्या आयुष्याचा मुख्य विषय त्याांचे शिक्षण आहे त्याासाठी लागणारी सरकारी कागदपत्रे जातीचा दाखला नॉन क्रिमीलेअर रहिवासी प्रमाणपत्र इत्याादी मिळण्यास अडचणी येतात आपल्या लाडक्या भाचे भाचींना सरकारी कार्यालयामध्ये खेटे मारावे लागत आहेत तरीही प्रमाणपत्र मिळत नाहीत तरी मामांनी लक्ष घालून ऑनलाइन प्रणाली सुरळीत करावी नाहीतर भाचे भाची आपल्यावर कायमचे नाराज होतील अशा आशियाचे पत्र शहरातील नागरिक विनोद शिनगारे लिहून सोशल मीडियावर व्हायरल केले आहे.

# उंदरखेड येथील शेतकऱ्याचा मुलगा अजिंक्य वामन झाला पोलीस

## आई-वडिलांच्या कष्टाचे केले चीज

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील उंदरखेड येथील शेतकरी सुभाष वामन यांचा मुलगा अजिंक्य वामन हा त्याचा मुलगा शालेय जीवनापासून हुशार होता आणि प्रयत्नांच्या परिकष्ठाने त्याला अखेर संभाजीनगर येथे झालेल्या पोलीस भरतीमध्ये मनोज दादा दादा जरागे पाटील यांच्या प्रयत्नातून झालेल्या कुणबी छाननी मुळे तो पोलीस म्हणून भरती झाला त्याला अखेर यश प्राप्त झाले आहे.



तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुले विविध जिल्ह्यांत नुकत्याच निकाल जाहीर झाल्येल्या पोलीस भरतीत उत्तम यश संपादन करून पोलिस शिपाई पदी निवड होत आहे त्याच धर्तीवर आष्टी तालुक्यातील उंदरखेड येथील अजिंक्य वामण हा नूकतीच संभाजी नगर येथे झालेल्या पोलीस भरती मध्ये पोलिस शिपाई म्हणून भरती झाला आहे.त्याचा सत्कार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी सत्कार केला.त्याच्या या यशाबद्दल

माजी सरपंच अंकुश वामन,आजिनाथ दहातोंडे. संजय पवार, बाबासाहेब वामन,किशोर वामन,अंबादास दहातोंडे चेअरमन, संदीप वामन,सुनील वामन, पांडुरंग वामन, सुभाष वामन,गणेश पवार व सर्व उंदरखेल ग्रामस्थ व परिसरातील गावातील ग्रामस्थांनी कौतुक करून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# चारा -पाण्यावाचून कोंडवाड्यातील जनावरांचा मृत्यू



बीड
नगरपालिकेचा
महाप्रताप



**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीमध्ये मोकाट जनावरांना कोंडवाड्यात बंदिस्त केले जाते मात्र यासाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था केली जात नाही. कोंढवाड्यात कमालीची घाण असते यामुळे बारा दिवसापूर्वी एका गाईचा आणि पिल्याचा चारा पाण्या वाचून मृत्यू

**नगरपालिकेला जनावरे सांभाळता येत नसतील तर गोशाळांना द्या**

**प्रजासत्ताक दिनी रणजीत पवार यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा**

झालेला आहे. जर नगरपालिका आणि नगरपंचायतींना जनावरे सांभाळता येत नसतील तर त्यांनी ही जनावरे गोशाळांना द्यावीत अशा मागणीसाठी रणजीत सदाशिव पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

## सांभाळता येत नसतील तर मोकाट जनावरे पकडता कशाला

शहरात फिरणारी मोकाट जनावरे पकडून वाहतूक सुरळीत करण्याच्या प्रयत्नामध्ये ही जनावरे कोंडवाड्यात कोंडून ठेवली जातात .मात्र त्यांचा चारा आणि पाण्याची व्यवस्था नगरपालिका करत नाही त्यामुळे जनावरांचा जीव जातो. जर तुम्हाला त्यांच्या चारा आणि पाण्याची व्यवस्था करता येत नसेल तर जनावरे पकडतात कशाला असा सवाल आता नागरिकही करू लागले आहेत.

## मुक्या प्राण्यांचा जीव वाचवणे आता जिल्हाधिकाऱ्यांच्या हातात

मुक्या प्राण्यांचा जीव वाचवणे जिल्हाधिकाऱ्यांच्या हातात असून केवळ चारा आणि पाण्यामुळे कोंडवाड्यात मृत्यू पावणारी जनावरे गोशाळांना देऊन त्यांचा जीव वाचवणे आता जिल्हाधिकाऱ्यांच्या हातात आहे. त्यांनी हा निर्णय त्वरित घ्यावा अशी मागणी होत आहे.

बीड जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत यांच्या माध्यमातून रस्त्यांवरील मोकाट फिरत असलेल्या जनावरांना पकडून कोंडवाड्यात बंदिस्त केले जाते. पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा मंत्री चंद्रकांत पाटील, आदिती तटकरे यांच्याकडून आढावा

## महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्यासह विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची उपस्थिती

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही शासनाची महत्वाची योजना असून श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यक्रमात या योजनेतील पात्र महिलांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात लाभ देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी येणाऱ्या महिला लाभार्थ्यांना सर्वप्रकारच्या सोईसुविधा उपलब्ध करुन देतानाच त्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ हस्तांतरणाच्या १७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या आयोजनाचा आढावा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कार्यक्रमस्थळी भेट देऊन घेतला. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रसाद लाड, आमदार भिमराव तापकीर, आमदार योगेश टिळेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे आदी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यस्तरीय कार्यक्रमासाठी येणाऱ्या महिला लाभार्थ्यांच्या सोयीसाठी प्रशासनाने बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, वैद्यकीय पथक, वाहतूक व्यवस्था, मोबाईल टॉयलेट, परिसराची स्वच्छता इत्यादी व्यवस्था चोखपणे कराव्यात. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणावर अर्ज करत आहेत. मात्र त्यांच्या



महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

अडचणी सोडविण्यासाठी आणि पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी शासकीय यंत्रणेसोबत सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे. विधान परिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, प्रशासनाने महिलांना सर्वप्रकारच्या योजनांचे लाभ द्यावे, तसेच पात्र महिला लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याची सूचना त्यांनी केली.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, राज्यात एकूण १ कोटी ४२ लाख महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ३ लाख महिलांनी नोंदणी केली आहे. राज्यात सर्वाधिक नोंदणी पुणे जिल्ह्यात झाली आहे हे लक्षात घेऊन लाभ प्रदानाचा राज्यस्तरीय कार्यक्रम पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. याच धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात संबधित पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखली लाभ प्रदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. त्या म्हणाल्या, सर्व पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी योजनेचे अर्ज भरून घेण्याची कार्यवाही मोहिमस्तरावर करावी. योजनेचा लाभ हस्तांतर करण्यासाठी महिलांचे बँकखाते आधार क्रमांकासह मोबाईल क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करा. त्यासाठी गावपातळीवर सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. सामाजिक कार्यकर्त्यांनी या महत्वाकांक्षी योजनेची ग्रामीण भागात सकारात्मक प्रसिद्धी करावी. नोंदणीसाठी काम करणाऱ्या आशासेविका, ग्रामसेवक, उमेद, माविम, अंगणवाडी सेविका अशा सर्वच घटकांचा कार्यक्रमात समावेश करा अशी सूचना त्यांनी केली. पावसाची शक्यता लक्षात घेऊन कार्यक्रमाचे नियोजन करा, बैठक व्यवस्था, पार्किंग, स्वच्छतागृहाची व्यवस्था आदी व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभ प्रदानाचा राज्यस्तरीय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केल्याचे सांगितले. बैठकीला विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

# ८६ हजार विद्यार्थी शुल्क परताव्याच्या प्रतीक्षेत

**पुणे । प्रतिनिधी**

इयत्ता दहावी, बारावीच्या ५ लाख ९९ हजार ६४ विद्यार्थ्यांना दुष्काळी स्थितीमुळे परीक्षा शुल्कमाफी देण्यात येणार आहे. पण, आधार क्रमांक चुकीचे असणे, खाते बंद असणे, खाते आधार संलग्न नसणे अशा तांत्रिक अडचणींमुळे आतापर्यंत ८६ हजार ३५ विद्यार्थ्यांना शुल्क परताव्याची रक्कम मिळालेलीच नाही.




राज्यातील १५ जिल्ह्यांतील ४० तालुके व १ हजार २१ महसूल भागांमध्ये दुष्काळसदृश स्थिती जाहीर करण्यात आली होती. राज्य मंडळाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी विद्यार्थी, पालकांच्या आधारसंलग्न बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीने रक्कम जमा करण्यासाठी माहिती मागवली. या कालावधीत दहावीचे ३ लाख ४८ हजार ९४२, तर बारावीचे २ लाख ५० हजार १२२ विद्यार्थ्यांची माहिती जमा झाली. या विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क रक्कम २९ कोटी २५ लाख ५३ हजार १६० रुपये होती. राज्य शासनाकडून या योजनेसाठी २०२३-२४ साठी ८ कोटी ९० लाख रुपयांचा निधी राज्य मंडळाला मिळाला. त्यानंतर राज्य मंडळाने दहावीच्या १ लाख १३ हजार ६४२ विद्यार्थ्यांना तर बारावीच्या ७४ हजार १०६ विद्यार्थ्यांना शुल्क परताव्याची प्रक्रिया सुरू केली. मात्र दहावीच्या ५६ हजार १५५, तर बारावीच्या २९ हजार ८८० विद्यार्थ्यांच्या खात्यात शुल्क परताव्याची रक्कम जमा झाली नाही. त्याबाबत बँकेने दिलेल्या अहवालानुसार काही कारणांमुळे रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे ३ कोटी ९२ लाख ५६ हजार ५८० रुपयांचा निधी राज्य मंडळाकडे शिल्लक राहिला. हा निधी योजनेतील उर्वरित ८० हजार ४५५ विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी बँकेला देण्यात आला आहे. तांत्रिक अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांबाबत विभागीय मंडळांच्या माध्यमातून तपशीलाची दुरुस्ती करण्यात येत आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना शुल्क परतावा करण्यात येणार आहे

# राज्यातील पहिल्या ट्रान्सजेंडर हेल्प-डेस्कचे लोकार्पण

**पुणे । प्रतिनिधी**

क्रांती दिनाचे औचित्य साधून सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय आणि सेंटर फॉर अ‍ॅड्व्होकसी अँड रिसर्च यांच्या पुढाकारातून निर्मित राज्यातील पहिल्या ट्रान्सजेंडर हेल्प-डेस्कचे लोकार्पण करण्यात आले. समाज कल्याणचे सहायक आयुक्त विशाल लोंढे आणि ट्रान्सजेंडर प्रतिनिधींच्या हस्ते या हेल्प-डेस्कचे लोकार्पण करण्यात आले.

विश्रांतवाडी येथे या हेल्प-डेस्कची निर्मिती करण्यात आली आहे. यावेळी सेंटर फॉर अ‍ॅड्व्होकसी अँड रिसर्चचे राज्य प्रकल्प व्यवस्थापक आनंद बाखडे, प्रितेश कांबळे, पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उप समाज विकास अधिकारी राजेंद्र मोरे, महात्मा फुले



जन आरोग्य योजनेच्या जिल्हा समन्वयक डॉ. प्रिती लोखंडे, पुणे महापालिकेचे समाज सेवक संदिप कांबळे, जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंटचे जॉर्ज स्वामी, ट्रान्सजेंडर कार्यकर्त्या ऐश्वर्या पांडव, आशिका पुणेकर, मोनिका पुणेकर आदी उपस्थित होते. शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजना व आरोग्यविषयक योजना आणि त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे पारलिंगी (ट्रान्सजेंडर) नागरिकांना एकाच छताखाली सहजपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी हा पुढाकार घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात ट्रान्सजेंडर नागरिकांसाठी एक बोर्ड असावे, यासाठी अनेकांनी पुढाकार घेतला व त्यातून ट्रान्सजेंडर बोर्डाची निर्मिती झाली. याचा पुढचा टप्पा म्हणजे हे हेल्प-डेस्क आहे.

ट्रान्सजेंडर नागरिकांसोबतचा भेदभाव रोखणे यासाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर प्रयत्न करायला हवा. हेल्पडेस्कची निर्मिती हे त्यासाठीचे महत्वाचे पाऊल आमच्या विभागाच्यावतीने उचलले आहे. अधिकाधिक ट्रान्सजेंडर व्यक्तींना ओळखपत्र मिळवून देण्यासाठी व त्या माध्यमातून त्यांना विविध शासकीय विभागांच्या योजना मिळवून देण्यासाठी हेल्प-डेस्कच्या माध्यमातून समन्वय साधला जाईल, असे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी सांगितले. या हेल्पडेस्कमध्ये शुभांगी चौघुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मदत व मार्गदर्शन मिळवण्यासाठी या हेल्पडेस्कचा हेल्पलाइन नंबर ९१५६८८८३६० जारी करण्यात आलेला आहे.

# पोलीस कोठडीत असलेल्या आरोपीचा उपचारादरम्यान मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पर्वती पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यात अटक केलेल्या एका ४७ वर्षीय आरोपीचा ससून रुग्णालयात मृत्यू झाला. अटक केल्यानंतर त्याच्या पोटात दुखत असल्याने ससून रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. सचिन अशोक गायकवाड (वय ४७) असे मृत्यू झालेल्या आरोपी तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पर्वती पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका चोरीच्या गुन्हा पोलिसांनी दोघांना ७ ऑगस्ट रोजी अटक केली होती. सचिन अशोक गायकवाड आणि मनोहर अशोक माने अशी त्यांची नावे आहेत. अटक केल्यानंतर दोघांना कोर्टासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस




कोठडी सुनावण्यात आली होती.

९ ऑगस्ट रोजी आरोपी सचिन गायकवाड हा विश्रामबाग लॉकअपमध्ये असताना अचानक त्याला चक्कर आली. त्यानंतर तातडीने त्याला रुग्णवाहिकेतून ससून रुग्णालयात नेण्यात आले. सेरेब्रल हॅमरेज आजार असल्यामुळे त्याच्यावर ससून रुग्णालयात शस्त्रक्रियाही करण्यात आली. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचा ससून रुग्णालयात मृत्यू झाला. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीआयडी कडे सोपवण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# गॅस कटरने एटीएम तोडून १५ लाख ८१ हजारांची रोकड लंपास

**खेड । प्रतिनिधी**

- गॅस कटरने एटीएम तोडून १५ लाख ८१ हजार ४०० रुपये रक्कम चोरून नेली. ही घटना शनिवारी (दि. १०) पहाटे साडेचार वाजता खेड तालुक्यातील सावरदरी येथे उघडकीस आली.



प्रमोद सहदेव परब (वय ३८, रा. लोहगाव, पुणे) यांनी याप्रकरणी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एचपी चौक ते वासुली फाटा रोड लगत सावरदरी गावात हिताची प्रॉपर्टी डेक्स सर्विसेस मार्फत एटीएम सेंटर सुरू करण्यात आले आहे. या एटीएम सेंटरमध्ये शुक्रवारी रात्री साडेआठ ते शनिवारी पहाटे साडेचार वाजताच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने एटीएम सेंटरच्या गाळ्याचे कुलूप गॅस कटरने तोडून आत प्रवेश केला.

गॅस कटरने एटीएम मशीनचा दरवाजा कट केला. मशीन मधून १५ लाख ८१ हजार ४०० रुपये रक्कम चोरून नेली. यामध्ये चार लाख रुपये किमतीच्या एटीएम मशीनचे नुकसान झाले आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

# लवासातील पडळघर येथील रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात

**मुळशी । प्रतिनिधी**

मोसे खोऱ्यातील पडळघर (ता.मुळशी) येथील रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांची तात्पुरती सोय झाली आहे. येथील रस्त्यासाठी बांधकाम विभागाने पोकलेनच्या साह्याने सपाटीकरण केले. पूर्वी असलेल्या पुलाच्या जागेवर मोऱ्या वापरल्या आहेत. त्यामुळे ये-जाचा प्रश्न मार्गी लागला आहे. लवासा परिसरामध्ये अतिवृष्टी झाल्याने रस्ते व पूल वाहून गेले होते.

दासवे हद्दीमध्ये दरड कोसळलेली आहे. त्यामुळे मोसे खोऱ्यातील विविध गावच्या सरपंच तसेच लोकप्रतिनिधींनी येथील अपघातांचा धोका लक्षात घेऊन पडळघर, रामनगर



व दासवे गावठाण परिसर आदी धोकादायक व जीवितहानी होण्यासारखी ठिकाणांची पाहणी केली होती. त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून, येथील विविध गावांच्या सरपंचांनी लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांना निवेदन देऊन ही कामे मार्गी लागावीत व निधी उपलब्ध व्हावा, यासाठी पाठपुरावा केला आहे.

त्यासाठी दासव्याच्या सरपंच स्वाती मोरे, माजी सरपंच शंकर धिंडले, भोईणीचे सरपंच राजेंद्र दबडे, नितीन मोरे, मूगावचे सरपंच संगीता मरगळे, माजी सरपंच गणपत मरगळे, दासवेचे मारुती मरगळे, धामण ओहोळचे सरपंच अमोल शेडगे, शरद भिकुले, रमेश मोरे, पाथरशेतचे सरपंच नितीन ढेबे, दासवेचे उपसरपंच अनिल मरगळे आदींनी पाठपुरावा केला.

# तुम्ही पर्यावरणाला वाचवा, पर्यावरण तुम्हाला वाचवेल - डॉ. भारती चव्हाण

**पुणे। प्रतिनिधी**

नागरीकांनी स्वतःच्या हव्यासासाठी वृक्षतोड केली आहे. प्रत्येकाने ठरवले पाहिजे माझ्या मुळे वृक्षतोड, प्रदूषण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. परिवर्तनासाठी प्रत्येक घटकांनी सामाजिक बांधिलकी समजून वृक्षारोपण केले पाहिजे आणि वृक्षरोपण हे फक्त शासनाचेच काम नाही ते आपले काम आहे. आपल्या कुटुंबाएवढाच वेळ पर्यावरणासाठी दिला पाहिजे, असे सांगत तुम्ही पर्यावरणाला वाचवा पर्यावरण तुम्हाला वाचवेल, असा सल्ला कामगार कल्याण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण यांनी दिला.

गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या वतीने पिंपळे गुरव येथे वृक्ष दिंडी काढली. पिंपळे गुरव येथील ८ टू ८० उद्यानाच्या बाजूला प्रथम वृक्षमित्र अरुण पवार व डॉ भारती चव्हाण यांनी वृक्ष पालखीचे पुजन केले. यावेळी चव्हाण बोलत होत्या. दिवसेंदिवस निसर्गाचा समतोल ढासळ चालला आहे, प्रत्येकाने




झाडे लावून जगवले पाहिजेत. देशी झाडे लावली पाहिजेत असे मत मंडळाच्या अध्यक्षा डॉ भारती चव्हाण यांनी वृक्षरोपणाच्या वेळी व्यक्त केले.

दिगंबर राणे यांनी गणेश वंदना म्हटली. वृक्षदिंडी मध्ये मंडळाचे कोअर कमिटी सदस्य आण्णा जोगदंड यांनी आपल्या शर्टवर पर्यावरण जनजागृतीचा संदेश दिला. तुकाराम महाराजांच्या वेशभूषेत हभप रामदास साबळे होते. तर किरण कांबळे यांनी डोक्यावर झाड, तोंडाला ऑक्सीजनचा मास्क लावून पर्यावरणाचा संदेश दिला. वृक्षवल्ली आम्हां, सोयरे, वनचरे असे भजन म्हणत पर्यावरणाचे स्लोगन हातात घेऊन वृक्षदिंडी काढली. वृक्षप्रेमीनी वृक्षदिंडीत फुगड्या खेळण्याचा आनंद घेतला. वृक्ष लागवड करून पर्यावरणाशी आदराने वागण्याचा सल्ला वृक्षमित्र अरूण पवार यांनी दिला. ते म्हणाले, आपल्या कुटुंबाप्रमाणे निसर्गावर प्रेम करा. तुकाराम महाराजांनी म्हटल्या प्रमाणे वृक्षवल्ली आम्हां, सोयरे, वनचरे या अभंगाप्रमाणे निसर्गाशी आदराने वागा. सर्वांनी वर्षभर, वृक्ष लागवड व संगोपन आपापल्या परीने चालू ठेवा. आजचे पर्यावरणाचे रक्षण म्हणजे उद्याच्या तरुण पिढीच्या ऑक्सिजनची सोय असे प्रतिपादन वृक्षमित्र अरुण पवार यांनी केले. वायु प्रदूषण ध्वनी प्रदूषण कमी करण्याचे आव्हान यावेळी वृक्षमित्र अरुण पवार यांनी दिले. त्यांनी सर्व ५०० झाडे मोफत वृक्षरोपणासाठी मोफत दिले. मंडळांनी केलेल्या उपक्रमाची उपस्थितांना वृक्षरोपणाच्या वेळी माहिती शहराध्यक्ष शरीफ महमंदशरीफ मुलानी यांनी दिली.

# विवाहाच्या १० वर्षानंतरही एमपीएससी परीक्षेमध्ये यश; पोलिस उपनिरीक्षक होण्याचा मिळविला बहुमान

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

जिद्द व चिकाटी असेल तर अशक्य गोष्ट ही शक्य होते. कळंब (ता.इंदापूर) येथील स्वाती गुंडूराम अर्जुन- मारकड महिलेने विवाहानंतर दहा वर्षानंतर वयाच्या २८ व्या वर्षी मुलांचा सांभाळ करीत,संसाराचा गाडा हाकत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये यश मिळविले. पोलिस उपनिरीक्षक होण्याचा बहुमान मिळवून माहेर व सासरचे नाव चमकवले आहे.

स्वाती अर्जुन- मारकड यांचे माहेर माळशिरस तालुक्यातील कुरुबावी आहे. आई लक्ष्मी मारकड व वडिल धनंजय मारकड यांची घरची परस्थिती बेताची आहे. मोलमजुरी करुन कुंटुब चालवता. स्वाती यांचे प्राथमिक शिक्षण कुरुबावी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये झाले. पाचवी- दहावी पर्यंत शिक्षण शिवपुरीमध्ये झाले. अकरा व बारावीपर्यंत शिक्षण कळंब मधील वालचंद विद्यालयामध्ये झाले. बारावीनंतर त्यांचा २०१४ मध्ये कळंब गावातील गुंडुराम हनुंमत अर्जुन



यांच्याशी विवाह झाला.विवाहानंतर त्यांनी शिक्षणामध्ये खंड पडू दिला नाही. महाविद्यालयीन शिक्षण सुरु ठेवले. २०१७ मध्ये सांगोल्यामधील फार्मासी कॉलेज मधून ग्रॅज्युशन पूर्ण केले. व स्पर्धा परीक्षेचा आभ्यास सुरु ठेवला. स्वाती यांनी सुरवातीपासुन आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आयुष्यात अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगले होते. आभ्यासाची जिद्द व चिकाटी सोडली नाही. यु-ट्युबच्या व्हिडिओ फायदा झाला. ऑक्टोबर २०२२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षा दिली. दरम्यानच्या काळामध्ये मुख्य परीक्षेसाठी वेळ असल्यामुळे जुन २०२३ सरळ सेवा परीक्षा दिली. ऑक्टोबर २०२३ मध्ये एमपीएससीची मुख्य परीक्षा दिली. सरळ सेवा परीक्षेमध्ये यश मिळाले होते. सातरामधील शासकीय रुग्णालयामध्ये औषधनिर्माण अधिकारी म्हणून रुजू झाल्या.नोकरी करीत असताना ग्राउंडची तयारी सुरु ठेवली. रयत प्रबोधनीमधील मार्गदर्शनकांनी केलेल्या मदतीचा ही फायदा झाला असल्याचे सांगितले.स्वाती अर्जुन हिचे कौतुक होत असून ग्रामस्थ कौतुक करीत आहेत.